सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ३ जून २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ५० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पुरुष लाभार्थ्यांकडून वसुली ?

मुंबई : ८० लाखहून अधिक महिलांना लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा इशारा दिलाय. तपासणी केल्यानंतर १४ हजार पुरुषांनीही या लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊन पैसे लाटले असल्याचं सरकारच्या लक्षात आलं. या प्रकरणी आता त्या लाभार्थी पुरुषांकडून वसूली केली जाणार असल्याचा इशारा मुख्यमंत्री फडणवीसांनी दिला.

## अनधिकृत होर्डिंगचा बळी

अहिल्यानगर : कर्जत तालुक्यातील राशीन परिसरात अनधिकृत आणि जीवघेण्या होर्डिंग्जचा आणखी एक बळी गेला असून २४ वर्षीय अमित मोहन सुकाळे या निष्पाप तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वादळी पाऊस आणि जोरदार वाऱ्याच्या पार्श्र्वभूमीवरही बॅनर फाटू नये म्हणून संबंधित ठेकेदाराने अमितला जबरदस्तीने लोखंडी होर्डिंगवर चढवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

## मतांची फोफाफोडी होणार ?

नागपूर : नागपूर विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले असून काँग्रेसने राज्याचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांना नागपूरातून उमेदवारी देत भाजपसमोर आव्हान उभे केले आहे. या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार अतुल लोंढे यांना विजयाची संधी असल्याचा विश्र्वास माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी व्यक्त केला आहे. ज्या पद्धतीने महायुतीमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, त्यामुळे आमच्या उमेदवाराला संधी आहे. असे नितीन राऊत म्हणाले.

## ठाण्यात पाणी कपात ?

ठाणे : हवामान विभागाने यंदा एल निनोच्या प्रभावामुळे कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. सरासरीच्या ९० टक्केच पाऊस होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. गेल्या ११ वर्षांतील सर्वात कमी पाऊस होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाणी टंचाईची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. ठाणे जिल्ह्यातील काही भागांत ४ जून ते ५ जूनदरम्यान, २४ तासांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

## ३० भारतीय अटकेत

वॉशिंग्टन : मेरिकेत बेकायदेशीरपणे राहणाऱ्या स्थलांतरितांवर पुन्हा एकदा तीव्र कारवाई करण्यात आली आहे, ज्यामध्ये भारतीयांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अमेरिकेच्या सीमा सुरक्षा दलाने स्थलांतर नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीरपणे कमर्शियल ट्रक चालवणाऱ्या ३० भारतीय नागरिकांसह एकूण ५२ जणांना अटक केली आहे. ही कारवाई अमेरिकेत सध्या सुरू असलेल्या ऑपरेशन चेकमेट या विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आली आहे. या मोहिमेमुळे अटक करण्यात आलेल्या सर्व संशयितांवर आता अमेरिकेतून हद्दपारीची कायदेशीर कारवाईची शक्यता निर्माण झाली आहे.

## अब्जावधी डॉलर्सची सोने विक्री ?

नवी दिल्ली : इराण आणि अमेरिकेतील संघर्षाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर खोलवर परिणाम होताना आता जाणवू लागले आहेत. एकीकडे देशाचे चलन सतत गंटागळ्या खात आहे तर दुसरीकडे शेअर मार्केटमधून गुंतवणूकदारही आहेर पडू लागले आहेत या दरम्यान, पश्चिम आशियातील परिस्थितीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर इतका गंभीर परिणाम झाला आहे की, भारतीय रिझर्व्ह बँकेला आपल्या तिजोरीतील अब्जावधी डॉलर्स किमतीचे सोने विकण्यास भाग पडले आहे असा खळबळजनक दावा समोर आला आहे.

# 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजने'साठी ६ हजार ४२९ कोटी

तभा वृत्तसेवा



मुंबई :राज्यातील ग्रामीण संपर्क व्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच रस्ते आणि पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी राज्य सरकारने मंगळवारी धोरणात्मक निर्णय घेतले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पायाभूत विकास, उच्च शिक्षण आणि सामाजिक क्षेत्राशी संबंधित एकूण चार महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३' ला गती देण्यासह राज्याला 'एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था' बनवण्याच्या उद्दिष्टासाठी दोन जागतिक बँकांकडून कर्ज घेण्यास हिरवा कंदील दाखवण्यात आला आहे.ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे मजबूत करण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-३' अंतर्गत आशियाई इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेच्या अर्थसहाय्याने सुमारे ३ हजार ५०० किलोमीटर लांबीचे रस्ते व पुलांच्या कामांसाठी ६ हजार ४२९ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी 'एआयआयबी'कडून ७० टक्के म्हणजेच सुमारे ४ हजार ५०० कोटी रुपये कर्ज स्वरूपात मिळणार असून, राज्य शासन ३० टक्के हिस्सा म्हणून सुमारे १ हजार ९२९ कोटी रुपये उपलब्ध करून देणार आहे. या कर्जाची परतफेड ५ वर्षांच्या सवलतीच्या कालावधीसह (ग्रेस पिरियड) एकूण २५ वर्षांत अर्थसंकल्पीय तरतुदीतून केली जाईल. निधी प्राप्त होईपर्यंत प्रगतीपथावरील कामांचा खर्च राज्य निधीतून केला जाणार असून, याशिवाय राज्य निधीतून स्वतंत्रपणे आणखी २ हजार ५०० किलोमीटर लांबीची रस्त्यांची कामे हाती घेण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे शेतीमालाची वाहतूक, शिक्षण आणि आरोग्य सेवांचा विकास वेगाने होईल.राज्यातील प्रमुख आर्थिक, औद्योगिक आणि कृषी मार्गिकांचा (ग्रोथ कॉरिडॉर) दर्जा उंचावण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्प' राबविण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक आणि न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून प्रत्येकी १ अब्ज अमेरिकी डॉलर्सचे कर्ज दोन टप्प्यांत घेतले जाईल. 'आयआरसी'च्या मानकांनुसार तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण केला जाईल. पहिल्या टप्प्यात दोन्ही बँकांच्या सहाय्यातून एकूण ७१५ दशलक्ष अमेरिकी डॉलर (सुमारे ६ हजार २२१ कोटी रुपये) खर्च केले जातील, ज्यातून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ईपीसी तत्त्वावर स्पर्धात्मक निविदांद्वारे १ हजार ५०० किलोमीटर (प्रत्येकी ७५० किमी) लांबीच्या रस्त्यांचे आधुनिकीकरण केले जाईल. यामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होऊन व्यापाराला गती मिळणार आहे.मुंबईतील उच्च शिक्षणाचा दर्जा अधिक व्यापक करण्यासाठी 'हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट समूह विद्यापीठाचा' विस्तार करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या समूह विद्यापीठामध्ये आता आणखी पाच नामांकित महाविद्यालयांचा घटक म्हणून समावेश करण्यात येईल. सद्यस्थितीत हसाराम रिजूमल वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय (प्रमुख) आणि किशनचंद चेलाराम (चर्चगेट) व बॉम्बे अध्यापक प्रशिक्षण महाविद्यालय (कुलाबा) यांचा यात समावेश आहे. आता यामध्ये प्राचार्य के. एम. कुंदनानी औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय (कफ परेड), किशनचंद चेलाराम विधी महाविद्यालय (चर्चगेट), श्रीमती मिठीबाई मोतीराम कुंदनानी वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय (वांद्रे-पश्र्चिम), ऋषी दयाराम आणि सेठ हसराम नॅशनल आणि सेठ वासियामुल्लु असोमुल्लु विज्ञान महाविद्यालय (वांद्रे-पश्र्चिम) आणि थडोमल शाहनी अभियांत्रिकी महाविद्यालय या पाच संस्थांचा नव्याने समावेश केला जाईल.राज्यातील गरजू घटकांपर्यंत वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ आणि श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळासाठी पदनिर्मितीला मंजुरी देण्यात आली. या तिन्ही महामंडळांसाठी प्रत्येकी ४ नियमित (व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक, सहायक व्यवस्थापक-प्रशासन आणि सहायक व्यवस्थापक-वित्त व लेखा) पडे प्रतिनियुक्तीने भरली जातील, तर ५ पदे बाह्यस्त्रोतांद्वारे (मल्टी टास्किंग स्टाफ) भरली जातील. यासाठी वार्षिक १.१८ कोटी रुपयांच्या प्रशासकीय खर्चास मंजुरी देण्यात आली

# शेतकरी कर्जमाफीला मंत्रिमंडळाची मंजुरी

## आचारसंहितेनंतर निकषांची घोषणा, ५६ लाख शेतकऱ्यांना दिलासा मिळणार

तभा वृत्तसेवा



मुंबई : महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्र्वासनाची पूर्तता केली असून, राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करणाऱ्या 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजने'ला मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मात्र, सध्या राज्यात विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्यामुळे या योजनेची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. आचारसंहितेची मुदत संपल्यानंतर कर्जमाफीचे सविस्तर निकष जाहीर केले जाणार असले, तरी २० जूनपर्यंत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे कसे जमा करता येतील, यादृष्टीने सरकारने युद्धपातळीवर प्रशासकीय हालचाली सुरू केल्या आहेत.

सध्या विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांमधील निवडणुकीची रणधुमाळी सुरू असल्यामुळे राज्यात आचारसंहितेचे नियम लागू आहेत. या काळात नियमांचा भंग होऊ नये आणि विरोधकांना निवडणूक आयोगाकडे दाद मागण्याची संधी मिळू नये, यासाठी सरकारने ही कायदेशीर खबरदारी घेतली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेनुसार, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले २ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज या योजनेअंतर्गत माफ केले जाणार आहे. या कर्जमाफीसाठी राज्याच्या तिजोरीवर अंदाजे २५ ते ३६ हजार कोटी रुपयांचा मोठा आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे म्हणजे, थकबाकीदारांसह नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे.

ज्य मंत्रिमंडळाने कर्जमाफी योजनेला मंजुरी दिली असली, तरी निवडणुकीची मतमोजणी पूर्ण होऊन आचारसंहिता शिथिल झाल्यानंतर कर्जमाफीच्या अंमलबजावणीचा आणि अर्जांच्या प्रक्रियेचा अधिकृत शासन निर्णय (जीआर) जारी केला जाईल. कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ मिळवण्यासाठी नेमके निकष काय असतील आणि अर्जांची छाननी कशी केली जाईल, याची सविस्तर माहिती निवडणूक प्रक्रिया संपल्यानंतरच अधिकृतपणे जाहीर होणार आहे.

# येत्या ४८ तासांत केरळमध्ये पाऊस बरसणार

तभा वृत्तसेवा



मुंबई : उन्हाच्या तीव्र झळा आणि असह्य उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांसाठी अखेर एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. बहुप्रतीक्षित नैऋत्य मान्सून आता अगदी उंबरठ्यावर येऊन पोहोचला असून, येत्या ४८ तासांत म्हणजेच ४ जूनच्या आसपास तो केरळमध्ये अधिकृतपणे दाखल होणार आहे.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी सध्या देशात अत्यंत अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. केरळसह लक्षद्वीप आणि तामिळनाडूच्या आणखी काही भागांमध्ये मान्सूनची आगेकूच वेगाने सुरू असून, लवकरच पावसाचा वर्षाव सुरू होईल. हवामान खात्याने स्पष्ट केले आहे की, मान्सूनचा प्रवास आता केवळ केरळ पुरता मर्यादित राहिलेला नाही. अरबी समुद्राच्या नैऋत्य आणि आग्नेय भागात मान्सूनने आपली पकड मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे, बंगालच्या उपसागरातील पश्र्चिम-मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य भागांतही मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. आग्नेय बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्येही ४ जूनपर्यंत मान्सूनचे ढग दाटून येतील. हवामान खात्याने मंगळवारी जारी केलेल्या पत्रकानुसार, अरबी समुद्र ते बंगालच्या उपसागरापर्यंत मान्सूनचा विस्तार होण्यासाठी परिस्थिती पूर्णपणे पोषक आहे. मान्सूनच्या आगमनासोबतच दक्षिण भारतात पावसाचा जोर प्रचंड वाढणार आहे. आयएमडीच्या (खचऊ) अंदाजानुसार, पुढील ६ ते ७ दिवसांत केरळमध्ये विखुरलेल्या स्वरूपात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळू शकतो. काही भागांत ७ ते २० सेंटीमीटर इतक्या विक्रमी पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे. केरळच्या सोबतीनेच तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यांतही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

या संपूर्ण आठवड्यात उत्तर-पश्र्चिम, मध्य, पूर्व भारत आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारताच्या काही भागांमध्ये ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहतील आणि मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट पाहायला मिळेल.आयएमडीच्या 'विस्तारित श्रेणी अंदाजा'नुसार , २८ मे ते ४ जून या काळात केरळमध्ये प्रामुख्याने हवामान कोरडे राहिले होते आणि ४ जूननंतर त्यात अतिशय संथ गतीने सुधारणा होईल. या संथ गतीमागे एक मोठे जागतिक हवामान बदलाचे कारण आहे. सध्या पश्र्चिम पॅसिफिक महासागरावर एक तीव्र 'टायफून' सक्रिय आहे. हे वादळ अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील बाष्प मोठ्या प्रमाणात स्वतःकडे खेचून घेत आहे. त्यातच लक्षद्वीप क्षेत्रावर निर्माण झालेल्या चक्रीय वाऱ्यांच्या स्थितीमुळे मान्सूनचे आगमन काहीसे उशिरा झाले असून, त्याची सुरुवातीची वाटचाल कमकुवत राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# नाशिकमध्ये मुसळधार पावसाची हजेरी

तभा वृत्तसेवा

नाशिक : राज्यातील हवामानात गेल्या काही दिवसांपासून बदल होत आहे. त्यामध्येच भारतीय हवामान विभागाने आज मोठा अलर्ट जारी केला होता. भारतीय हवामान विभागाने मराठवाडा, नाशिक, छत्रपती संभाजीनगरमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा दिला होता. त्यानुसार नाशिकमध्ये पावसाने आज हजेरी लावली.

नाशिकमध्ये मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. आज मंगळवारी (दि.२) वादळी वाऱ्यासह नाशिकमध्ये जोरदार पाऊस झाला. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. मात्र, गेल्या काही दिवसांपासून प्रचंड उकाड्याने हैराण झालेल्या नाशिककरांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला आहे.

नाशिकच्या शालीमार, पंचवटी, सिडको, गंगापूर रोड, सातपूर, जुने नाशिक या भागात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. सोसाट्याच्या वाऱ्यासह काही काळ आलेल्या पावसाच्या जोरदार सरींनी एकच धावपळ उडाल्याचे चित्र काही ठिकाणी पहायला मिळाले. अचानक आलेल्या या सरींनी उघडयावर विक्री करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांची मात्र आपला माल सुरक्षित ठिकाणी नेण्यासाठी चांगलीच धावपळ उडाल्याचे चित्र शहराच्या विविध भागात पहायला मिळाले.

# शिवराज्याभिषेकाच्या ३५३ व्या वर्धापन दिनासाठी रायगड सज्ज!



तभा वृत्तसेवा

रायगड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या ३५३ व्या वर्धापन दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर ५ आणि ६ जून रोजी भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आहे आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि अभ्यासकांच्या उपस्थितीत हा ऐतिहासिक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या सोहळ्यानिमित्त प्रशासन सज्ज झाले आहे.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. युवराज संभाजीराजे छत्रपती, संयोगिताराजे छत्रपती आणि शहाजीराजे छत्रपती यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे नियोजन करण्यात आले असून अनेक स्वयंसेवक आणि समित्यांचा यात सहभाग आहे. या सोहळ्याच्या पार्श्र्वभूमीवर रायगड परिसरात विशेष तयारी करण्यात आली आहे.

गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, वैद्यकीय सेवा, सुरक्षा यंत्रणा तसेच मार्गदर्शन केंद्रांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गडावर होणारी मोठी गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने सर्व तयारी पूर्णत्वाकडे नेली आहे. पहिल्या दिवशी ५ जून रोजी पाचाड येथील राजमाता जिजाऊ यांच्या समाधीस्थळी अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर रायगड चढाई, गडपूजन, पारंपरिक युद्धकलेची प्रात्यक्षिके, शाहिरी कार्यक्रम, गोंधळ आणि भजन-कीर्तन अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुसऱ्या दिवशी ६ जून रोजी मुख्य राज्याभिषेक दिन साजरा केला जाणार आहे.

ध्वजारोहण, शिवछत्रपतींच्या पालखीचे आगमन, उत्सवमूर्तीचा अभिषेक, सुवर्णमुद्रांचा अभिषेक आणि पालखी सोहळा हे कार्यक्रम यावेळी पार पडतील. तसेच शिवभक्तांना संबोधित करण्यासाठी संभाजीराजे छत्रपती उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या शेवटी छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी अभिवादन करून सोहळ्याची सांगता करण्यात येणार आहे. स्वराज्याच्या इतिहासाला उजाळा देणारा हा सोहळा यंदाही महाराष्ट्रातील शिवप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे

# मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन: पालघरमध्ये तिसऱ्या डोंगराळ बोगद्याचे काम फत्ते;

## अवघ्या ५ महिन्यांत महाराष्ट्रातील 'हे' मोठे आव्हान पूर्ण

तभा वृत्तसेवा

पालघर : देशातील पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाच्या म्हणजेच 'मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन'च्या कामात महाराष्ट्राच्या पदरात आणखी एक मोठे यश पडले आहे. पालघर जिल्ह्यामध्ये ४१७ मीटर लांबीच्या आणि १४.४ मीटर रुंदीच्या तिसऱ्या डोंगराळ बोगद्याचे खोदकाम यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याला तांत्रिक भाषेत 'ब्रेकथ्रू' असे म्हटले जाते. या यशामुळे आता या हाय-स्पीड कॉरिडॉरच्या कामाला प्रचंड वेग मिळणार असून रेल्वे वर्तुळातून याचे मोठे कौतुक होत आहे.



केंद्रीय रेल्वेमंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून या यशाची घोषणा करत आनंद व्यक्त केला आहे. रेल्वे मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हा तिसरा डोंगराळ बोगदा पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील 'अंबेसरी' गावाजवळ अत्यंत दुर्गम भागात तयार करण्यात आला आहे. भौगोलिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही, भारतीय अभियंते आणि कामगारांनी दिवस-रात्र मेहनत करून हे मोठे आव्हान लीलया पेलले आहे. या बोगद्याचे खोदकाम अत्यंत शास्त्रोक्त आणि आधुनिक पद्धतीने करण्यात आले. बोगद्याच्या दोन्ही टोकांकडून एकाच वेळी खोदकामाला सुरुवात झाली होती. यासाठी 'कंट्रोल ड्रिलिंग' आणि 'ब्लास्टिंग' या प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. खोदकाम करताना डोंगराची सुरक्षितता धोक्यात येऊ नये, म्हणून अत्याधुनिक मॉनिटरिंग सिस्टीम आणि विशेष भू-तांत्रिक उपकरणांची मदत घेण्यात आली. सुरक्षेचे सर्व आंतरराष्ट्रीय निकष पाळून हे काम सुरक्षितपणे पूर्ण करण्यात आले.

या नव्या कामगिरीसह महाराष्ट्राच्या हद्दीत येणाऱ्या सर्वच्या सर्व ३ डोंगराळ बोगद्यांचे खोदकाम आता शंभर टक्के पूर्ण झाले आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे हे तिन्ही कठीण बोगदे अवघ्या ५ महिन्यांच्या विक्रमी वेळेत तयार करण्यात आले आहेत. हे तिन्ही बोगदे महाराष्ट्रातील बोईसर आणि गुजरातमधील वापी या दोन प्रमुख औद्योगिक शहरांना जोडणाऱ्या रेल्वे मार्गावर येतात. या यशाचे प्रतीक म्हणून नवी दिल्लीतील रेल्वे मंत्रालयाच्या गेट नंबर ४ वर देशातील पहिल्या बुलेट ट्रेनचे भव्य मॉडेलही प्रदर्शनासाठी लावण्यात आले आहे. ५०८ किलोमीटर लांबीचा हा संपूर्ण मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड कॉरिडॉर जपान सरकारच्या तांत्रिक आणि आर्थिक सहकार्याने विकसित केला जात आहे.

या मार्गावर धावणाऱ्या बुलेट ट्रेनचा ताशी वेग तब्बल ३२० किलोमीटर इतका असणार आहे. या वेगवान प्रवासामुळे महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांमधील व्यावसायिक आणि आर्थिक संबंधांना एक नवी दिशा मिळेल, तसेच दळणवळणाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून जाईल.

बुलेट ट्रेनचा हा प्रवास मुंबईतील 'वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स' या भूमिगत स्थानकापासून सुरू होईल. त्यानंतर ही ट्रेन ठाणे, विरार, बोईसर, वापी, बिलीमोरा, सुरत, भरूच, वडोदरा, आणंद आणि अहमदाबाद मार्गे प्रवास करत गुजरातच्या 'साबरमती' स्थानकावर थांबेल.

सर्वसामान्यांचा प्रवासाचा वेळ वाचवण्यासाठी या रेल्वेची विशेष आखणी करण्यात आली आहे. जर ट्रेन सर्व स्थानकांवर थांबली तर प्रवासाला थोडा जास्त वेळ लागेल, परंतु 'लिमिटेड हॉल्ट्स' असलेल्या विशेष ट्रेनला फक्त सुरत, वडोदरा आणि अहमदाबाद याच मुख्य स्थानकांवर थांबा दिला जाईल. या जलद गतीच्या ट्रेनमुळे मुंबई ते अहमदाबाद हे अंतर अवघ्या २ तास ७ मिनिटांत पार करणे शक्य होणार आहे, जे सध्याच्या रस्ते किंवा एक्सप्रेस रेल्वेच्या प्रवासापेक्षा कमालीचे कमी आहे.

# अण्णामलाईचा भाजपाला रामराम

नवी दिल्ली: तामिळनाडू भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी पक्षाला रामराम करण्याचा विचार पक्का केला आहे. आपल्या निर्णयाची कल्पना त्यांनी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांना दिली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अण्णामलाई यांनी मंगळवारी सकाळी पक्षाच्या अध्यक्षांची भेट घेत आपल्याला पक्षात राहायचं नसल्याचं स्पष्टपणे सांगितलं.मला माझा मार्ग स्वत: तयार करायचा आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने 33,128 वाहनांच्या विक्रीची नोंद केली

**बंगळूरू:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज मे 2026 महिन्यातील विक्री कामगिरी जाहीर केली. कंपनीने या महिन्यात एकूण 33,128 वाहनांची विक्री नोंदवली असून, मे 2025 मधील 30,864 वाहनांच्या विक्रीच्या तुलनेत 7% वाढ दर्शवली आहे. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत विक्री झालेली 30,574 वाहने आणि निर्यात केलेली 2,554 वाहने यांचा समावेश आहे. मे 2025 मध्ये कंपनीची एकूण विक्री 30,864 युनिट्स होती, जी मे 2026 मध्ये वाढून 33,128 युनिट्सवर पोहोचली. यामुळे कंपनीने वर्षानुवर्षे 7 टक्के वाढ नोंदवली.देशांतर्गत विक्री मे 2025 मधील 29,280 युनिट्सवरून मे 2026 मध्ये 30,574 युनिट्सपर्यंत वाढली असून, त्यात 4 टक्के वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे निर्यातीत लक्षणीय वाढ दिसून आली असून ती मे 2025 मधील 1,584 युनिट्सवरून मे 2026 मध्ये 2,554 युनिट्सपर्यंत पोहोचली आहे, म्हणजेच 61 टक्के वाढ झाली आहे.

## १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित

**छत्रपती संभाजीनगर:** आपल्या सेवा क्षेत्रातील २० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (एनएसई: स्टारहेल्थ; बीएसई: 543412) महाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली आहेत. याद्वारे स्थानिक समुदायांपर्यंत मुलभूत तपासणी, आरोग्य जागरुकता आणि आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करण्याची सुविधा पोहोचवण्यात आली. पुणे, सातारा, अहिल्यानगर, बारामती, दौंड, कोल्हापूर, धुळे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अकोला, नांदेड, लातूर, धाराशिव, नंदुरबार आणि बीड येथे हा उपक्रम राबवण्यात आला, जेथे वेळेवर निदान आणि सक्रिय आरोग्य सेवेची व्यापक उपलब्धता वाढवण्यावर भर देण्यात आला.

## सरपंच पोपटराव वारुळे यांना 'महाधन योद्धा पुरस्कार २०२६'

अहिल्यानगर -प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाधन अ‍ॅग्रीटेक लिमिटेड तर्फे अहिल्यानगर जिल्ह्यातील पोखर्डी तालुक्यातील सरपंच पोपटराव अंतु वारुळे यांना ऊस लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा 'महाधन योद्धा पुरस्कार – 2026' प्रदान करण्यात आला. नंदनवन लॉन्स, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाधन योद्धा पुरस्काराद्वारे संतुलित पीक पोषण, वैज्ञानिक शेती पद्धती आणि कार्यक्षम अन्नद्रव्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून उल्लेखनीय उत्पादनक्षमता साध्य करणाऱ्या प्रगत शेतकऱ्यांचा गौरव केला जातो. हा सन्मान पीक उत्पादनक्षमता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक पीक पोषण उपाययोजनांचे वाढते महत्त्व अधोरेखित करतो.

## 4 लाखांहून अधिक भारतीय योगाला रोजची सवय बनवत आहेत

**नाशिक :** मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था , आयुष मंत्रालयाने हॅबिल्ड भारतातील पहिले हॅबिट-बिल्डिंग प्लॅटफॉर्म यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. या करारातून आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 च्या पूर्वसंध्येला देशभरात डिजिटल योग उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सहयोगाचा उद्देश नागरिकांना संरचित आणि सहज उपलब्ध ऑनलाइन कार्यक्रमांद्वारे योगाला रोजच्या जीवनाचा सोपा भाग बनवण्यास प्रोत्साहित करणे आहे. योगा 365' उपक्रमाचा भाग म्हणून, हॅबिल्ड आणि एमडीएनआयवाय, आयुष मंत्रालयाने (मार्च 2026 मध्ये) मोठ्या प्रमाणावर डिजिटल योग चळवळ सुरू केली आहे. 21 जून 2026 पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश लोकांना सलग 100 दिवस दररोज योगाभ्यास करण्यास प्रवृत्त करणे आहे. या उपक्रमात आधीच 4 लाखांहून अधिक सक्रिय सहभागी 130+ देशांमधून आणि भारतातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांमधून सहभागी झाले आहेत आणि 21 जूनपर्यंत हा आकडा आणखी वाढण्याची अपेक्षा आहे.

## सिंटेक्सने उत्तम आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी 'स्मार्ट' टाकी लॉंच केली

**छत्रपती संभाजीनगर :** भारताची अग्रगण्य आणि विश्वसनीय पाणी साठवण उत्पादक कंपनी, वेलस्पन वर्ल्डचा भाग असलेली सिंटेक्स महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर मध्ये घेऊन आली आहे एक नाविन्यपूर्ण सिंटेक्स 'स्मार्ट' टाकी. ही टाकी 100% व्हर्जिन प्लास्टिकपासून तयार करण्यात आली आहे, ज्यामुळे ती फूड-ग्रेड असून दीर्घकालीन पिण्यायोग्य पाण्याच्या साठवणुकीसाठी सुरक्षित आहे आणि त्यामुळे भारतीय कुटुंबांच्या आरोग्य व कल्याणाला प्राधान्य दिले जाते. भारतीय कुटुंबांच्या बजेट-जाणिवेच्या गरजा लक्षात घेऊन, सिंटेक्सने स्मार्ट टाकी किफायतशीर दरात 8 वर्षांच्या वॉरंटीसह उपलब्ध करून दिली आहे, ज्यामुळे दर्जेदार पाणी साठवण उपाय औरंगाबादमधील प्रत्येक कुटुंबाच्या आवाक्यात येतात.

## शिवम अंकुर जाधव यांना 'महाधन योद्धा पुरस्कार २०२६'

छत्रपती संभाजीनगर, 2 जून 2026-प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने महाधन अ‍ॅग्रीटेक लिमिटेड(एमएएल) तर्फे छत्रपती संभाजीनगर, जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील सरपंच शिवम अंकुर जाधव यांना कापूस लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा 'महाधन योद्धा पुरस्कार – 2026' प्रदान करण्यात आला. लोकमत भवन, जालना रोड, छत्रपती छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## मीशोची बीएसईसोबत भागीदारी

पुणे - वार्षिक व्यवहार करणारे ग्राहक आणि ऑर्डर्सच्या संख्येच्या बाबतीत भारतातील सर्वात मोठे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म असलेल्या 'मीशो'ने बीएसईच्या भागीदारीत 'प्रोजेक्ट शिखर' सुरू करण्याची घोषणा केली आहे. या उपक्रमांतर्गत, एमएसएमई ना बीएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर सार्वजनिकरीत्या सूचीबद्ध होण्यासाठी मदत केली जाईल; ज्यामुळे त्यांना त्यांच्या विकासासाठी आवश्यक भांडवल उभारणे शक्य होईल.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव

दिनांक : 10-04-2024

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, शारदा नामदेव गायकवाड यांनी मोहल्ला योगेश्वरी नगरी स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक प्लॉट नं. 21- 1911 त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतुःसीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : 9 मीटर रोड व वापर — पश्चिम : लागुन गट नं.
दक्षिण : रो हाऊस नंबर 22 — उत्तर : रो हाऊस नंबर 20
आकार : पूर्व पश्चिम 48-720 चौ.फुट दक्षिणोत्तर 35-44 बांधीव

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

---

क्षेत्र वेरुळ येथे मालोजीराजे भोसले गढी वर 352 वा शिवराज्याभिषेक सोहळा दि 6 जून रोजी

# हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीत साजरा करणार : राजेंद्र पवार



तभा वृत्तसेवा

**खुलताबाद प्रतिनिधी दि २ जून :** स्वराज्य संकल्प भूमी पितृ तीर्थ श्रीक्षेत्र वेरुळ येथे शहाजीराजे भोसले स्मारकासमोर ५१ विविध क्षेत्रातील मान्यवर जोडप्यांच्या हस्ते सामूहिक शिव राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन श्री क्षेत्र वेरूळ येथे दि ६ जून २०२६ रोजी सकाळी आठ वाजता करण्याचे योजिले असून या सोहळ्यासाठी छत्रपती संभाजी नगर जिल्हा व महाराष्ट्र मधील ५१ मान्यवरांची सह पत्नीक उपस्थिती राहणार असून त्यांच्या शुभ हस्ते छत्रपती शिवरायांच्या ५१ मूर्तींचा सामूहिक अभिषेक संपन्न होणार आहे हा सोहळा देशभरात मोठ्या उत्साहामध्ये संपन्न होत असतो विशेषता स्वराज्याची राजधानी रायगड या ठिकाणी लाखो मावळ्यांच्या उपस्थितीमध्ये भव्य दिव्य प्रमाणे हा सोहळा साजरा होत असतो मागील २ वर्षापासून मालोजीराजे भोसले गढीवर हा सोहळा दरवर्षी करण्याचा मानस स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार व त्यांच्या मित्र परिवाराचे वतीने करण्यात येत आहे हे ३ रे वर्ष आहे . सोहळा आयोजन करण्या मागचा हेतू असा आहे की स्वराज्याचा संकल्प ज्या पवित्र भूमीमध्ये झाला ती भूमी म्हणजे श्रीक्षेत्र वेरूळ या ठिकाणी छत्रपती शिवरायांचे पूर्वज बाबाजी राजे भोसले मालोजीराजे भोसले यांचे पुत्र शहाजीराजे भोसले यांनी स्वराज्य निर्माण करण्याचा संकल्प भगवान घृष्णेश्वराच्या साक्षीने केला होता या पवित्र व पराक्रमी भूमीमध्ये बाबाजीराजे भोसले ,मालोजीराजे भोसले, विठोजीराजे भोसले ,शहाजीराजे भोसले त्यांचे बंधू शरीफ जिराजे भोसले, व्यंकोजीराजे भोसले, छत्रपती शिवरायांचे थोरले बंधू संभाजीराजे भोसले यांचा जन्म या पवित्र भूमीमध्ये झाला आहे या जागेचे वैशिष्ट्य म्हणजे स्वराज्य संकल्पक शहाजी राजे भोसले व मा जिजाऊ यांच्या विवाह नंतर खूप मोठा काळ मालोजीराजे भोसले गढी मध्ये त्यांचे वास्तव्य होते अशा या पवित्र मातीमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा झाला पाहिजे या पवित्र भावनेने या सोहळ्याची सुरुवात मागील २ वर्षापासून करण्यात आली आहे हे ३ रे वर्ष असून भोसले घराण्याचा उगमस्थान असलेली भूमी वर मोठ्या थाटामाटा मध्ये यावर्षी सुद्धा शिवराज्याभिषेक दिन साजरा होणार आहे.

या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कोल्हापूर येथून सिंहासनावर बसलेले छत्रपती शिवरायांच्या ५१ शिवमुर्ती अभिषेकासाठी आणण्यात आल्या असून या शिवमुर्तींना अभिषेकासाठी सप्त नद्यांची पाणी, समुद्र जल, पंचामृत, सुवर्णा जल, रजत जल, औषधी जल, फळांचा राजा आमरस अशा १६ प्रकारच्या विविध जलानी निमंत्रित ५१ जोडप्यांच्या हस्ते महाराजांना अभिषेक संपन्न होणार आहे अभिषेक सकाळी बरोबर ८.३० मिनिटांनी सुरू होणारा असून ९.३० वाजता संपन्न होईल.

अभिषेक संपन्न झाल्यानंतर या शिवमूर्ती निमंत्रित मान्यवरांना प्रतिष्ठानच्या वतीने भेट म्हणून देण्यात येईल या सोहळ्याची शोभा वाढवण्यासाठी सर्व मान्यवरांना भगवे फेटे, स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले व छत्रपती शिवराय यांचे स्मारक फुलांनी सजवले जाईल सोबत भालदार, चोपदार ,तुतारी व अभिषेकासाठी आकर्षक बैठक व्यवस्था हे या सोहळ्याचे वैशिष्ट्य असून अभिषेक सोहळा संपन्न झाल्यानंतर सर्वांना प्रसाद देण्यात येईल तरी सर्व शिवभक्तांना आवाहन करण्यात येते की ज्यांना रायगडावर जाणं शक्य नाही त्यांनी शिवराज्याभिषेक दिनी मोठ्या उत्साहाने श्री क्षेत्र वेरूळ येथे या सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे दरवर्षी या सोहळ्यासाठी विशेषतः साधुसंत व राजकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांची उपस्थिती सोहळ्या मध्ये असते यावर्षी सुद्धा अनेक साधुसंतासह जिल्ह्याचे पालकमंत्री संजयजी शिरसाठ साहेब महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय अतुल सावे साहेब जिल्ह्याचे खासदार संदीपानजी भुमरे साहेब माझी अर्थ राज्यमंत्री भागवत जी कराड आ प्रशांत आ रमेश बोलणारे आ संजना ताई जाधव माजी विरोधी पक्ष नेता आ अंबादास दानवे आअनुराधाताई चव्हाण आ सतीश चव्हाण जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे महापौर समीर राजूरकर उपमहापौर राजेंद्र जंजाळ खुलताबाद तालुक्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी व जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्य यासह खुलताबाद तालुक्यातील सर्व पत्रकार बांधव व अभिषेकाला सह पत्नीक उपस्थित राहणारे निमंत्रित मान्यवर यांची उपस्थिती राहणार आहे तरी या पवित्र दिवशी पवित्र व पावन ऐतिहासिक ठिकाणी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने दि ६ जून रोजी सकाळी ८ वाजता मालोजीराजे भोसले गडी श्री क्षेत्र वेरुळ येथे उपस्थित राहावे असे आव्हान वेरूळ ग्रामस्थ व आयोजक स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी केले आहे..

# १५ दिवसांच्या प्रशिक्षणातून घडल्या सजग, सक्षम आणि राष्ट्रभक्त तरुणी; लीनाताई गहाणे यांचे प्रतिपादन

तभा वृत्तसेवा



छत्रपती संभाजीनगर, राष्ट्र सेविका समितीच्या प्रवेश व प्रबोध शिक्षा वर्गाच्या समारोप सोहळ्यात भारताची वैश्विक विचारधारा, स्त्रीशक्तीचे योगदान आणि राष्ट्रनिर्माणातील महिलांची भूमिका यावर प्रभावी मार्गदर्शन करत समितीच्या अखिल भारतीय सह-बौद्धिक प्रमुख लीनाताई गहाणे यांनी भारताचा मूलस्वभाव 'वसुधैव कुटुंबकम्' असल्याचे सांगितले. संपूर्ण विश्वाला कुटुंब मानणारा भारत योग, अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाच्या बळावर पुन्हा एकदा विश्वगुरूत्वाकडे वाटचाल करीत असल्याचे त्यांनी नमूद केले.

बीड बायपास येथील डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या रामचंद्र मेडिकल इन्स्टिट्यूटच्या प्रांगणात आयोजित समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. 'जाग उठा है आज देश का वह सोया अभिमान' या विषयावर भाष्य करताना त्यांनी भारतीय संस्कृतीतील स्त्रीचे स्थान अधोरेखित केले. वेदकाळातील ऋषिकांपासून ते मंगलयान मोहिमेतील महिला शास्त्रज्ञांपर्यंत भारतीय स्त्रियांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केल्याचे त्यांनी सांगितले.

समारोप कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व भगव्या ध्वजाच्या अनावरणाने झाली. यानंतर शिक्षार्थी सेविकांनी मानवंदना, घोष, गणसमता, नियुद्ध, दंड, यष्टी, योगचाप आणि व्यायामयोगाची आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

देवगिरी प्रांताच्या सहकार्यवाहिका अंजली बडवे यांनी महिलांनी मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम होऊन राष्ट्रभक्त नागरिक घडविण्यात पुढाकार घ्यावा, यासाठी समिती सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. आर. के. दमाणी मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. सौ. शिरडकर यांनीही समितीच्या कार्याचे कौतुक करत या प्रशिक्षणातून घडणाऱ्या मुली देशाच्या उज्ज्वल भवितव्यात महत्त्वपूर्ण योगदान देतील, असा विश्वास व्यक्त केला.

प्रवेश वर्गाचा अहवाल संघमित्रा कापडी यांनी तर प्रबोध वर्गाचा अहवाल राधिका भिडे यांनी सादर केला. या वर्गात प्रवेश विभागासाठी ७१ तर प्रबोध विभागासाठी ६३ तरुणींनी सहभाग नोंदविला. समारोप कार्यक्रमास नागरिक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पदाधिकारी, स्वयंसेवक व सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंदे मातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

## एफ एस ए एस ॲप द्वारे आता शेतकऱ्यांना नोंदवावी लागेल अनुदानित (सबसिडी असलेल्या) खताची मागणी

**सिल्लोड :** खरीप हंगामामध्ये खत खरेदी करिता शेतकऱ्यांना सुलभता व्हावी, खत व्यवस्थापन योग्य रीतीने होणे व खते शेतकऱ्यांना वेळेत मिळावी याकरिता कृषी विभागाने एफ एस ए एस ॲप द्वारे खता साठी अर्ज करणे बंधनकारक केलेले आहे सदर ॲप डाऊनलोड करून त्यामध्ये शेतकऱ्यांनी स्वतःचा आधार क्रमांक व फार्मर आयडी क्रमांक टाकल्यास त्यावर जमीनीचा तपशील दिसून येईल यानंतर पिकाची नोंदणी करावी. शेतकऱ्यांनी त्यांना त्यांच्या पिकानुसार द्यावयाची खतांची मात्रा नोंदवायची आहे. खताची नोंदणी झाल्यानंतर कोणत्या किरकोळ दुकानातून तुम्हाला खते खरेदी करणे आहेत याची नोंद करायची आहे त्यानुसार ॲपवर एक क्यू आर कोड जनरेट होईल आणि ज्या वेळेस खते खरेदी करायचे आहे तो कोड संबंधित दुकानदाराला दाखवने बंधनकारक आहे वर नोंदणी करतेवेळी खत खरेदी स्वतः करणार अथवा अन्य प्रतिनिधी द्वारे खत खरेदी करणार याची पण माहिती नोंदवणे गरजेचे आहे जर वेगवेगळ्या प्रकारचे खते इतर दुकानातून घ्यायचे असल्यास त्याप्रमाणे वेगळा क्यूआर कोड मिळणार आहे .खताची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर जो क्यू आर कोड मिळेल तो फोनच्या गॅलरीमध्ये सेव करून ठेवायचा आहे जेणेकरून नेटवर्क नसतानाही आपणास खरेदी करताना कोणती अडचण येणार नाही आणि खत खरेदी करतेवेळी तो दुकानदाराला दाखवल्यानंतर आपणास आपण नोंदवल्याप्रमाणे खते मिळतील.

> तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी तात्काळ ॲप डाऊनलोड करून घ्यावे व खताची मागणी नोंदवावी जेणेकरून आपणास खते वेळेत मिळतील
> सौ अनिताताई सुरेश बनकर
> सभापती
> पंचायत समिती सिल्लोड.

> सर्व शेतकरी बांधवांना विनंती की त्यांनी सदर ॲप डाऊनलोड करून घ्यावे व त्यानुसारच खताची मागणी नोंदवावी आणि एफ एस ए एस ॲप बाबत काही अडचणी असल्यास कृषी विभाग पंचायत समिती सिल्लोड अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा
> रत्नाकर पगार
> गटविकास अधिकारी
> पंचायत समिती सिल्लोड

## जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त कन्नड बस आगारात जनजागृती शिबिर





**कन्नड :** दि.०१ जून - जागतिक तंबाखू विरोधी दिन (३१ मे) तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून कन्नड बस आगारात दंत-मुखरोग तपासणी, तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत समुपदेशन आणि जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मुदखेडकर यांच्या आदेशानुसार, ग्रामीण रुग्णालय कन्नडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अनिरुद्ध गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व कन्नड बस आगार प्रशासनाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

शिबिरात बस आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मौखिक आणि दंत तपासणी करण्यात आली. ग्रामीण रुग्णालयातील दंत शल्यचिकित्सक डॉ. नितीन सरवदे यांनी तंबाखू सेवनामुळे होणारे मुखरोग, कर्करोगाची लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपाय याविषयी मार्गदर्शन केले.

या शिबिरात एकूण ६३ जणांची मौखिक तपासणी व समुपदेशन करण्यात आले. त्यापैकी ८ जणांमध्ये कर्करोगपूर्व (प्रि-कॅन्सरस) लक्षणांचा संशय आढळून आल्याने त्यांना पुढील तपासणी व उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय, कन्नड येथे संदर्भित करण्यात आले. यावेळी आगार प्रमुख विजय कळवणे, स्थानक निरीक्षक सागर पाटील, दंत सहाय्यक दादासाहेब गायकवाड यांच्यासह बस आगारातील कर्मचारी उपस्थित होते. शिबिरातून तंबाखूमुक्त जीवनाचा संदेश देत आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली.

---

## सोयगाव बस आगारातील कृष्णा मिसाळ व अशोक गिते यांचा सत्कार



**सोयगाव,दि.१ जून :** सोयगाव एसटी बस आगारातील वाहतूक नियंत्रक कृष्णा मिसाळ,सोयगाव व चालक अशोक गिते (लोहारा) यांची एसटी महामंडळाच्या सेवेतून निवृत्त झाले.यानिमित्त रविवार रोजी त्यांचा सोयगाव बस आगाराच्या वतीने त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.त्यानिमित्ताने सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेच्या वतीने त्यांचा शाल,फुल गुच्छ व भेट घेऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सोबत यावेळी कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन योगेश बोखारे,संदिप सोहणी सह आदी उपस्थित होते.

## सोयगाव एसटी महामंडळाचा 78 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा ; प्रवाशांचे स्वागत



**सोयगाव,दि.१ वार्ताहर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (MSRTC) ७८ वा वर्धापन दिन सोमवार रोजी सकाळी १० वाजता सोयगाव आगार व बसस्थानक पातळीवर अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने सकाळी सोयगाव बसस्थानकावरून सुटणाऱ्या बसच्या चालक-वाहकांचा आणि प्रवाशांचा सत्कार करून वर्धापन दिन सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.आगार आणि बसस्थानकाची आकर्षक सजावटवर्धापन दिनाचे औचित्य साधून सोयगाव आगार व्यवस्थापनाच्या वतीने संपूर्ण बसस्थानक परिसर आणि मुख्य आगार आकर्षक रांगोळी व फुलांचे हार लावून सजवण्यात आले होते.आगारातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते एसटीच्या 'लालपरी'चे विधीवत पूजन करण्यात आले. यानंतर सकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे आणि लहान मुलांचे गुलाबपुष्प व पेढे देऊन स्वागत करण्यात आले.उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा गौरववर्षभरात कोणतीही दुर्घटना न करता सुरक्षित प्रवासी सेवा देणारे चालक, प्रवाशांशी सौजन्याने वागणारे वाहक आणि गाड्यांच्या देखभालीत मोलाचे योगदान देणारे यांत्रिक कर्मचारी यांचा आगार व्यवस्थापकांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी सोयगाव आगाराचे आगार व्यवस्थापक,मनिष जवळेकर सहाय्यक वाहतूक निरिक्षक कैलास बागुल,वाहतुक नियंत्रक,वर्जन जाधव,अशोक तायडे,सतिश पाटील,विनोद जाधव,समाधान जाधव,निलेश पाटिल,वाहक अनुराधा महाले,चालक.अशोक क्षिरसागर शिपाई,मधुकर आमटे,प्रवाशी,चालक-वाहक,यांत्रिक विभागाचे कर्मचारी आणि मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

## भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या पंकज ठोकळचा कन्नड नगर परिषदेकडून सत्कार



तभा वृत्तसेवा

**कन्नड दि.०२ जून :** काशिनाथ पाटील विद्यालयाचा विद्यार्थी पंकज बाळासाहेब ठोकळ याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल कन्नड नगर परिषदेच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नवनियुक्त नगराध्यक्षा फरीन बेगम अब्दुल जावेद शेख, मुख्याधिकारी रवींद्र लांडे, नगरसेवक अब्दुल जावेद शेख, नगरसेवक सुधाकर देवकर, सामाजिक कार्यकर्ते राजू शेख तसेच प्रशासकीय अधिकारी सचिन भामरे उपस्थित होते.

मान्यवरांनी पंकज ठोकळ याचे अभिनंदन करून त्याच्या भावी कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सैन्य, पोलीस व अन्य स्पर्धात्मक क्षेत्रांकडे वळून देशसेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

भारतीय सैन्य दलात निवड होणे ही कन्नड तालुक्यासाठी अभिमानाची बाब असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सत्कारानंतर पंकज ठोकळ याने यशामागील मेहनत, जिद्द आणि कुटुंबीयांचे योगदान याविषयी मनोगत व्यक्त केले.

---

उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर
10 जाक्र 2026/संकीर्ण/जमृअ/सीआर-301/कावि-03
दिनांक / /2026

### जाहीर प्रगटन

अर्जदारः-श्री. / श्रीमती. अमोल ज्ञानेश्वर वेताळ रा.मु. देवपुडी पो कासाबखेडा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर विरुध्द

गैरअर्जदारः उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम 1969 सुधारीत अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. अमोल ज्ञानेश्वर वेताळ, रा.मु. देवपुडी पो कासाबखेडा ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर यांचा अर्ज दि. 16.03.2026

विषयाकींत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम 1969 चे सुधारीत अधिनियम 2023 चे कलम 13 (3) अन्वये अर्जदार यांचे मुलगा नामे, अव्दिक अमोल वेताळ यांचा दिनांक 05.05.2024 रोजी लाईफ लाईन हॉस्पिटल, बीडबाय पास ता. जि. छ. संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. अमोल ज्ञानेश्वर वेताळ यांचे मुलगा नामे, अव्दिक अमोल वेताळ यांची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर

उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे सिया मुलगा नामे, अव्दिक अमोल वेताळ यांचा दिनांक 05.05.2024 रोजी लाईफ लाईन हॉस्पिटल, बीडबाय पास ता. जि. छ. संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/ तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन 30 दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप / हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप /हरकत/तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / 2026 रोजी देण्यात आले.
दिनांक- / /2026
ठिकाण -- छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर करीता

---

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. 2025/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-568

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

दिनांक 20-05-2026

अर्जदार - विजय आसाराम धुपे रा. देवपुडी ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार - ग्रामपंचायत कार्यालय देवपुडी ता.कन्नड जि. छ.संभाजीनगर

विषय - जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ / ॲड. मार्फत / स्वतः अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगीचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगी हर्षदा विजय धुपे चा जन्म दिनांक 12-04-2007 रोजी देवपुडी ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी चा जन्म दिनांक 12-04-2007 रोजी देवपुडी ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगी हर्षदा विजय धुपे यांचा जन्म दिनांक 12-04-2007 रोजी देवपुडी ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक 01-07-2026 रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणाचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक 12-04-2007 रोजी देवपुडी ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक शिक्क्यानिशी दिले आहे. ../05/2026 रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### ताडकळस टी-पॉइंटवर हायवा-दुचाकीची समोरासमोर धडक; पोलीस कर्मचारी गंभीर जखमी

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील ताडकळस टी-पॉइंट परिसरात सोमवारी (दि. १ जून) सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास हायवा आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात परभणी पोलीस मुख्यालयातील एक पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले. अपघातानंतर हायवा चालक घटनास्थळावरून पसार झाला असून पोलिसांनी हायवा वाहन ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणी पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेले शिवराम मनमत अष्टुरकर हे दुचाकी (एमएच २६ बीयू ९७०५) वरून प्रवास करीत असताना ताडकळस टी-पॉइंट येथे समोरून येणाऱ्या हायवासोबत त्यांची जोरदार धडक झाली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले.घटनेची माहिती मिळताच पूर्णा पोलीस ठाण्याच्या ११२ हेल्पलाईनवरील अंमलदार सुरेश चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ १०८ रुग्णवाहिकेशी संपर्क साधून जखमींना उपचारासाठी पूर्णा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर शिवराम अष्टुरकर यांची प्रकृती गंभीर असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. दरम्यान, अपघातानंतर हायवा चालक वाहन सोडून फरार झाला असून पूर्णा पोलिसांनी संबंधित हायवा जप्त केला आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### तरोडा येथील दोन युवकांची भारतीय सैन्य दलात निवड; गावात आनंदोत्सव

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील तरोडा येथील अभिषेक दत्तराव शेळके आणि प्रकाश उद्धवराव शेळके या दोन युवकांची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या बळावर या दोन्ही युवकांनी भारतीय सैन्य दलात स्थान मिळवले आहे. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगत त्यांनी सातत्यपूर्ण मेहनत घेतली आणि अखेर आपल्या ध्येयापर्यंत मजल मारली.

अभिषेक शेळके आणि प्रकाश शेळके यांच्या निवडीमुळे तरोडा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. त्यांच्या यशामुळे गावातील इतर युवकांनाही सैन्य दलात भरती होण्यासाठी प्रेरणा मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. दोन्ही युवकांच्या निवडीबद्दल ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. देशसेवेची संधी मिळाल्याचा अभिमान व्यक्त करत कुटुंबीयांनीही आनंद व्यक्त केला आहे.

### मदिना नगरातील जीर्ण विद्युत यंत्रणा दुरुस्त करण्याची मागणी; यामिन पटेल फाउंडेशनचे निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** प्रभाग क्रमांक २ मधील मदिना नगर परिसरातील जीर्ण झालेल्या विद्युत यंत्रणेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून मान्सूनपूर्वी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी यामिन पटेल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

यामिन पटेल फाउंडेशनचे अध्यक्ष शेख यामीन पटेल यांनी यासंदर्भात महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले. त्याद्वारे, परिसरातील लोंबकळणाऱ्या व जीर्ण झालेल्या विद्युत तारा, खराब अवस्थेतील लोखंडी व सिमेंटचे वीज खांब तसेच उघड्या अवस्थेतील वितरण पेट्या (डी.पी.) यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मदिना नगर परिसरातील विद्युत व्यवस्था सुमारे ४० वर्षांपूर्वीची असून ती आता कालबाह्य झाल्याचे सांगण्यात आले आहे. पावसाळ्याच्या काळात तारा तुटणे, वीजपुरवठा खंडित होणे तसेच शॉर्टसर्किटमुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

परिसरातील संपूर्ण विद्युत यंत्रणेचे तांत्रिक सर्वेक्षण करून जीर्ण तारा व वीज खांब तातडीने बदलण्यात यावेत, विद्युत तारांवर वाढलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात यावी तसेच उघड्या डी.पी. सुरक्षित करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांची सुरक्षा आणि अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने मान्सूनपूर्वी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा पटेल यांनी या निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.

### अधिकमासानिमित्त श्री लक्ष्मी नारायण मंदिरात आजपासून 'श्री विष्णू महापुराण' कथेचे आयोजन




**परभणी,/प्रतिनिधी :** अधिक मास आणि पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधून येथील श्री लक्ष्मी नारायण मंदिरात २ जून पासून भव्य 'श्री विष्णू महापुराण' कथेचे आयोजन करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध कथा प्रवक्ते पंडित निर्मलकुमारजी शुक्ल यांच्या रसाळ व ओजस्वी वाणीतून ही कथा भाविकांना ऐकण्याची संधी मिळणार आहे.

प्रभावती नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या परभणीत प्रथमच विष्णू महापुराण कथेचे आयोजन होत असल्याने या धार्मिक सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अधिक मासाच्या निमित्ताने धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वीच्या चार अधिक मासांमध्ये भाविकांच्या सहकार्याने श्रीमद्भागवत कथा, श्रीराम कथा आणि श्री शिवपुराण कथा यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या समृद्ध परंपरेला पुढे नेत यंदा श्री विष्णू महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. ही कथा २ जून ते ८ जून या कालावधीत दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्री लक्ष्मी नारायण मंदिर, स्टेशन रोड, परभणी येथे होणार आहे. कथेच्या माध्यमातून भगवान विष्णूंचे चरित्र, धर्म, भक्ती, सदाचार आणि जीवनमूल्यांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचविला जाणार आहे. भाविकांनी आपला अमूल्य वेळ देऊन कथेचा लाभ घ्यावा आणि आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# गंगाखेड परिसरात अवैध वाळू उपसा करणाऱ्या हायवा गाड्यांवर पोलिसांची मोठी कारवाई

**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** गंगाखेड परिसरात अवैध वाळू उपसा करणाऱ्या हायवा गाड्यांवर पोलिसांची मोठी कारवाई; ९० लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त*

*गंगाखेड / प्रतिनिधी:* गंगाखेड तालुक्यातील नळदगाव रस्त्यावर अवैधरीत्या वाळूची चोरी करून वाहतूक करणाऱ्या ३ हायवा गाड्यांवर पोलिसांनी रात्रीच्या सुमारास धडक कारवाई केली आहे. या कारवाईत एकूण ९० लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ३१/०५/२०२६ रोजी रात्री २०.०० वाजण्याच्या सुमारास नळदगावपासून दक्षिणेस १ किमी अंतरावर, नळद ते गोपा रोडवर (ता. गंगाखेड, जि. परभणी) ही कारवाई करण्यात आली. शासनाच्या मालकीच्या गौण खनिजाची (रेती/वाळू) चोरी करून, महसूल बुडवून आणि पर्यावरणाचा ऱ्हास करून बेकायदेशीररीत्या वाळूची चोरटी विक्री करण्यासाठी ही वाहतूक केली जात होती.

*जप्त केलेला मुद्देमाल आणि वाहने (फायलीनुसार):*

* *हायवा क्र. ०३६५३७:* (चालक: नसिर जानीमियाँ पठाण, मालक: पठाण रिजवान खाँन इमाम खान, वय ३४ वर्षे, रा. ममता कॉलनी, गंगाखेड).

* *हायवा क्र. ४८१८१२:* किंमत ३०,००,००० रुपये, पांढरे हेड व निळ्या रंगाचा डाला (चालक: बालाजी वैजनाथ इंगळे, मालक: विष्णू शिंदे, रा. राजूर, ता. पालम). या वाहनात ५ ब्रास वाळू (किंमत २५,००० रुपये) आढळून आली.

* *हायवा क्र. १३९२१७:* किंमत ३०,००,००० रुपये, पांढरे हेड व निळ्या रंगाचा



डाला (चालक: रामचंद्र राबवड, मालक: यशवंत वाळके, रा. वाळकी पोखरणी, ता. गंगाखेड). याही वाहनात ५ ब्रास वाळू (किंमत २५,००० रुपये) भरलेली होती.

* हायवा गाड्यांमध्ये अवैध वाळू भरण्यास सांगणारे मुख्य सूत्रधार *रवि पंडीत* व *दिनेश परखड* यांच्यासह चालकांवर आणि मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

*या कलमान्वये गुन्हा दाखल:*

याप्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता ( ) कलम ३०३(२), ३(५), पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ९, १५, सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम कलम ३, ७ आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम ४८(७), ४८(८) अन्वये कायदेशीर फिर्याद नोंदवण्यात आली आहे. फायलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे (१००४९१४०२८.), या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक (*) **श्रीकांत व्यंकटराव डोंगरे ( )* हे स्वतः करीत आहेत. गंगाखेड पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले आहेत.

या कारवाईची फिर्याद पोलीस अधीक्षक यांचे विशेष पथक तक्रारदार पो ह सूर्यकांत ताटी कोडलवार यांनी दिली आहे तर त्यांच्या सोबत व पोउपनिरीक्षक संदीप शिंदेपो उपनिरीक्षक अर्जुन टर्के पोहे शेख इशादपोह यशवंत वाघमारे पोहचुडावकर पोशी वावळे यांनी या पथकात विशेष कामगिरी केली आहे त्यामुळे अवैध्य वाळू वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत या कार्यामुळे पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाचे सर्व नागरिकांनी कौतुक करीत आहे

## विनायक शिराळे यांची सहाय्यक संचालक पदावर झाली पदोन्नती



**परभणी,/प्रतिनिधी-** पूर्णा तालुक्यातील फुलकळस गावचे भूमिपुत्र तथा पूर्णेचे रहिवासी विनायक अर्जुन शिराळे यांची महाराष्ट्र शासनाकडून सहाय्यक संचालक (वित्त व लेखा) पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. पदोन्नतीनंतर त्यांची प्रादेशिक विभागीय उपायुक्त कार्यालय, समाज कल्याण विभाग, लातूर येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

विनायक शिराळे हे यापूर्वी नांदेड येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) येथे लेखाधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय व आर्थिक कामकाजाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना ही पदोन्नती दिली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल फ ुलकळस गावासह पूर्णा येथील उप कोषागार अधिकारी प्रकाश कोत्तावार,ॲड.संजय गव्हाणे, संपत तेली,शिवप्रसाद देवणे,सतीश टाकळकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## रायगडावरील सोहळ्यासाठी परभणीतील शिवभक्त सहभागी

**परभणी ,/प्रतिनिधी-** अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, दुर्गराज रायगड यांच्या वतीने आणि युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या मार्गदर्शनाखाली ५ व ६ जून रोजी दुर्गराज रायगड येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर परभणी येथे नियोजन बैठक उत्साहात पार पडली. स्टेडियम कॉम्प्लेक्स येथील सकल मराठा समाज कार्यालयात झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

बैठकीस मराठा समन्वयक बालाजी मोहिते, संभाजी सेना रामेश्वर शिंदे, स्वराज्य संघटनेचे सचिन आवरगंड, संभाजी सेना जिल्हाप्रमुख विठ्ठल तळेकर, इंद्रजित आवरगंड, बाबासाहेब बचाटे, रामदास अवचार, निवृत्ती नवघरे, छगनराव मोरे, बाळासाहेब शिंदे सोसकर, अमोल अवकाळे, गोविंद इक्कर, स्वप्निल गरुड, संदीप गव्हाणे, श्याम कुटे, गोविंद लोणसने, मोहन गुंजकर, राम काजळे, रमेश देशमुख यांच्यासह विविध शिवप्रेमी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत बोलताना समितीच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास आणि रायगडाचे ऐतिहासिक महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी शिवराज्याभिषेक सोहळ्याची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. या सोहळ्याला दरवर्षी वाढता प्रतिसाद मिळत असून तो आता लोकोत्सवाचे स्वरूप धारण करत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावर्षीच्या सोहळ्यासाठी समितीच्या सुमारे ४० उपसमित्या कार्यरत असून वाहतूक, निवास, अन्नछत्र, स्वच्छता आणि स्वयंसेवक नियोजनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहिती देण्यात आली. शिवभक्तांची वाढती संख्या लक्षात घेऊन गडाच्या पायथ्याशी दोन आणि गडावर दोन ठिकाणी अन्नछत्राची व्यवस्था करण्यात आल्याचेही सांगण्यात आले.

समितीचे सदस्य नितीन देशमुख यांनी प्रास्ताविकात परभणी जिल्ह्यातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले. तसेच विविध कारणांमुळे रायगडावर जाणे शक्य नसलेल्या शिवभक्तांनी आपल्या गाव, तालुका आणि शहर स्तरावर शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करावा, असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव आवरगंड यांनी केले. संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड यांनी समारोप करत उपस्थितांचे आभार मानले. यावेळी साहेबराव कल्याणकर, बाळासाहेब काजळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.



**परभणी- मराठवाड्यातील सर्व रेल्वे स्टेशनसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देऊन विकास करण्याची मागणी डॉ. शिवाजी शिंदे यांनी केली असून यावेळी बैठकीत उपस्थित असलेले अधिकारी व पदाधिकारी दिसत आहेत.**

### दरगड यांचे निधन

**जिंतूर,/प्रतिनिधी :**



तालुक्यातील लिंबाळा येथील ज्येष्ठ नागरिक दुरगाजी नामदेव दराडे माली पाटीलराहणार लिंबाळा तालुका जिंतूर जिल्हा परभणी वय ७० वर्षे यांचे दीर्घ आजाराने रविवारी सकाळी आठ वाजता निधन झाले निधनाची वार्ता समजतात लिंबाळा गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यांच्या पक्षात एक मुलगा मुली सासवड असा मोठा परिवार आहे रविवारी सायंकाळी त्यांच्यावर लिबाळायेथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे त्यांच्या निधनामुळे दराडे परिवार दुः खाचा डोंगर कोसळलेला आहे.

## कृषि विद्यापीठातील लेखा आक्षेप प्रकरणावर मनसेचे आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील प्रलंबित लेखा आक्षेप (ऑडिट ऑब्जेक्शन्स) प्रकरणावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सोमवारी (दि.०१) आक्रमक भूमिका घेत विद्यापीठ प्रशासनाविरोधात आंदोलन केले. लेखा आक्षेप निकाली काढण्याबाबत प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याचा आरोप करत मनसे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रशासनाचा निषेध व्यक्त केला.

मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, विद्यापीठ प्रशासनाने ३० मे ही अंतिम मुदत निश्चित करून प्रलंबित लेखा आक्षेप पूर्ण न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, मुदत संपल्यानंतरही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने आणि प्रशासनाकडून स्पष्ट उत्तर मिळत नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी नमूद केले. आंदोलनादरम्यान कुलगुरू दौऱ्यावर असल्याने उपस्थित राहू शकले नसल्याची माहिती देण्यात आली. मात्र, यावर मनसेने तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासन जबाबदारीपासून दूर पळत असल्याचा आरोप केला.

हे आंदोलन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा संघटक श्रीनिवास लाहोटी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

# जिंतूर एसटी आगारात एसटीचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**जिंतूर,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त जिंतूर एसटी आगारात उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी आगार परिसर आकर्षक रांगोळ्यांनी सजविण्यात आला असून कर्मचाऱ्यांमध्ये आणि प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमास आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण, प्रमुख पाहुणे प्रवासी महासघाचे तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार उपाध्यक्ष महेश देशमुख, यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनानिमित्त प्रवाशांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सेच प्रवाशांना पेढे वाटप करून एसटीच्या गौरवशाली प्रवासाचा आनंद साजरा करण्यात आला. प्रवाशांनीही या उपक्रमाचे स्वागत करत एसटी महामंडळाच्या सेवेला शुभेच्छा दिल्या. यावेळी आगार परिसरात फुलांच्या सजावटीसह रंगीबेरंगी रांगोळ्यांची सजावट करण्यात आली होती. आगार परिसर स्वच्छ करण्यात आला. रांगोळ्यांमधून एसटीच्या ७८ वर्षांच्या सेवेला मानवंदना देण्यात आली. कर्मचारी व अधिकाऱ्यांनी एसटी ही ग्रामीण भागाची जीवनवाहिनी असल्याचे सांगत प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. आगारातील अधिकारी, कर्मचारी आणि प्रवासी यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. गेल्या अनेक दशकांपासून ग्रामीण व शहरी भागांना जोडणाऱ्या एसटी महामंडळाने राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली असून,भविष्यातही ही सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. जागतिक व देशपातळीवरील इंधनाची



टंचाई व भाव वाढ लक्षात घेता लक्षात घेता सुजाण प्रवाशी वर्गाने असुरक्षित असणाऱ्या खाजगी वाहनाच्या तुलनेत सुरक्षित सेवा देणाऱ्या व विविध सवलती असणाऱ्या एसटी महामंडळाने प्रवास करण्याचे आव्हान आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण यांनी वर्धापन दिनानिमित्त उपस्थित प्रवाशी वर्गांना आवाहन केले. या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमास आगार व्यवस्थापक आनंद चव्हाण स्थानक प्रमुख पाहुणे प्रवासी महासघाचे तालुकाध्यक्ष सचिन रायपत्रीवार उपाध्यक्ष महेश देशमुख, प्रमुख रामेश्वर सोनवणे वाहतूक निरीक्षक शरद पाटील आगार लेखाकर ज्ञानेश्वर पांचाळ, प्रमुख कारागीर सुनील पंडित,वरिष्ठ लिपिक,प्रल्हाद मुंडे,राहुल लिखें लिपिक गजानन घुगे,गजानन गीते, गुणीरत्न वाकोडे, शिल्पा टारफे, सुरक्षारक्षक समी पठाण,सुनील घुगे,चालक अतुल घोडके,वाहक शंकर भाग्यवंत उपस्थित होते.

२५ वर्ष सुरक्षित सेवा घेणाऱ्या चालकांचा केला विशेष गौरव चालक सेवेच्या पंचवीस वर्ष किंवा जास्त सेवा बजावलेल्या चालकात सुरेश नारायण दुधाळकर चा. क्र. ३६५३, भारत रामभाउ डाके चा. क. ९९८७, गुलाब हेमा राठोड चा. क. ९९५८,शेख अकबर शेख युसूफ चा. क. ९८६४, शेख बाबुलाल शेख हूसेन चा. क. ९४३४ या सह सेवानिवृत्त झालेले चालक मंजा सखाराम पांचाळ चा.क. १८९३५,व विठठल विश्वनाथ जमगुंडे चा. क. ९९०४ सुरक्षित सेवा बजावणाऱ्या या चालकांचा विशेष सत्कार करून गौरविण्यात आले.

## अग्रलेख...

# अवजड इतिहासाचे ओझे!

महानगरांमधील ब्रिटिशकालीन वसाहतवादाचे अवशेष मानले जाणारे आणि धनवंतांच्या आलिशान सवयींकरिता सुविधा देणाऱ्या 'जिमखाना' या गोंडस नावांमागे दडलेले सामाजिक विषमतेचे एक वास्तव आता अनेक वर्षांनंतर समोर येऊ लागले आहे. आणखी तीन दिवसांनी, म्हणजे ५ जून रोजी ल्युटियन्स दिल्लीतील जिमखाना क्लबची जमीन आणि परिसर रिकामा करण्याच्या सरकारी आदेशाचे भवितव्य निश्चित होईल आणि त्यानंतर महानगरी मुंबईतील अशाच आलिशान जिमखान्यांचा गाशा गुंडाळण्याची प्रक्रिया सुरू होईल. श्रीमंतीच्या झगमगाटी जगण्याचा दुरूनदेखील अनुभव घेणे ज्यांना जन्मात शक्य नव्हते, अशा समाजघटकांस सावली देणारी घरे किंवा देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणारा एखादा क्रांतिकारी प्रकल्प कोट्यवधींची किंमत असलेल्या आणि कवडीमोलाने वापरल्या जाणाऱ्या या मालमत्तांवर उभा राहिला, तर ते देशातील एक सर्वांत मोठे परिवर्तन ठरणार आहे. म्हणून काहीसे बेदखल राहिलेल्या या प्रकरणाची दखल घेणे गरजेचे आहे.

ब्रिटिश राजवटीत, ब्रिटिश भारताची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीत हलविण्याची घोषणा राजा जॉर्ज पंचम यांनी १९११ मध्ये केली आणि हजारो ब्रिटिश अधिकारी दिल्लीत दाखल झालेत. या अधिकाऱ्यांना संध्याकाळच्या निवांत वेळी मद्याचे घुटके घेत शिळोप्याच्या गप्पा मारता येतील, पोलोसारखे खेळ खेळता येतील; सोबतच भारतातील सत्तेचे राजकारण करण्यासाठी धोरणे आखता येतील अशा जागेची गरज लक्षात घेऊन निवडण्यात आलेल्या या विशाल भूखंडावर ३ जुलै १९१३ रोजी 'इम्पीरियल दिल्ली जिमखाना क्लब'चा जन्म झाला. राजधानी दिल्लीच्या मध्यभागी, पंतप्रधानांच्या निवासस्थानापासून अगदी हाकेच्या अंतरावरील, ल्युटियन्स दिल्ली नावाने परिचित असलेल्या या भागातील जागेची सध्याच्या बाजारभावाची एकरी किंमत हजारो कोटी रुपये आहे, पण दिल्ली जिमखाना क्लबच्या सुमारे साडेसत्तावीस एकर जागेसाठी मात्र वर्षाकाठी एक हजार रुपये भाडे आकारले जाते आणि सरकारी मालकीच्या या मालमत्तेचा वापर धनवंतांच्या सुखासीन जगण्याच्या परंपरागत रीतीने सुरू असलेल्या सुविधांकरिता केला जातो. आज दिल्लीतील नव्हे, तर कोणत्याही शहरांमधील एखाद्या गरीब कुटुंबासही एक-दीड खोलीच्या लहानशा घरासाठी महिन्याकाठी भाड्यापोटी हजारो रुपये मोजावे लागतात, तेथे, महानगरी राजधानी दिल्लीतील या मोक्याच्या भूखंडावर मात्र, धनवंतांना वर्षाकाठी जेमतेम हजार रुपये भाडे भरून कोट्यवधींच्या सुविधा उपभोगता येतात. जी जमीन सार्वजनिक मालमत्ता आहे, म्हणजे, जिच्या मालकीवर सामान्य जनतेचाही समान हक्क आहे, त्या जमिनीचा वापर धनवंतांचे कोडकौतुक करण्याहूनही अधिक महत्त्वाच्या आणि देशहिताच्या कामासाठी करण्याकरिता केंद्र सरकार सरसावले असेल, तर ते सरकारच्या संवेदनशीलतेचे उदाहरण ठरते. दिल्ली जिमखाना क्लबला बजावलेल्या नोटिशीनुसार, ही २७.३० एकर जागा रिकामी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. संरक्षणविषयक पायाभूत सुविधा आणि राष्ट्रीय सुरक्षेची जपणूक करण्यासाठी तसेच सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हा परिसर रिकामा करणे आवश्यक असल्याचा दावा केंद्र सरकारने केल्यानंतर लगेचच, सरकारच्या या नोटिशीविरोधात क्लबने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. केंद्रीय आवास आणि शहरी व्यवहार मंत्रालयाच्या अखत्यारीतील भूमी आणि विकास कार्यालयाने दिल्ली जिमखाना क्लबचा भाडेपट्टा रद्द केला आहे आणि या क्लबपाठोपाठ महानगरी मुंबईतील अशाच आलिशान क्लब्जचा कारभारदेखील वेशीवर येणार आहे.

दिल्ली जिमखाना क्लबवरील या कारवाईमागे आणखीही काही कारणे असल्याची चर्चा राजधानीत सतत सुरू असते. या क्लबची आर्थिक स्थिती भक्कम आहे. मुळात, खेळांना प्रोत्साहन देणे हा कोणत्याही जिमखान्याचा मूळ उद्देश असताना, केवळ उच्चभ्रू वर्गांसाठी आणि त्यांची प्रतिष्ठा मिरविण्यासाठी मोक्याच्या भूखंडावर आलिशान क्लब उभारून ते धनवंतांचे 'स्टेटस सिम्बॉल' ठरविण्यास अनेकांचा आक्षेप होता. खेळांच्या नावाखाली जमीन मिळवली गेली, पण खेळांवर फारसा खर्च झालाच नाही. क्लबच्या सदस्यत्वासाठी शेकडो लोक दीर्घकाळापासून प्रतीक्षा करत ताटकळले आहेत आणि त्यांच्याकडून सदस्य नोंदणीसाठी जमा झालेले पैसे मात्र परत केले गेले नाहीत, असाही आक्षेप आहे. प्रत्यक्षात प्रतीक्षायादीतील अनेकांस सदस्यत्व मिळालेले नाही आणि सर्वसामान्य लोकांना तर या जागेवर फिरकणेदेखील शक्य झाले नाही. काँग्रेसकालीन उच्चभ्रू वर्गाच्या कोंडाळ्याचा कब्जा असलेल्या या क्लबमध्ये जवळपास ३७ वर्षांच्या प्रतीक्षायादीतील अनेकांना शिरकाव करता आला नव्हता. २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर भाजपचे नेतेदेखील प्रतीक्षायादीत दाखल झाले आणि इतरांसोबत तेही सदस्यत्वासाठी प्रतीक्षा करत राहिले. शाही भूतकाळाच्या नावाखाली, केवळ उच्चभ्रू लोकांसाठीच सदस्यत्व खुले असणे हा एक प्रकारे वंशभेदासारखाच प्रकार असून संविधानाच्या सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टाचे उल्लंघन करणारा आहे, असा आक्षेप घेतला जाणे साहजिकही होते.

दिल्लीतील या कारवाईमुळे मुंबईतील जिमखानेदेखील आता चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. सरकारी जमिनीवर उभ्या असलेल्या आणि सुखासीनांचे चोचले पुरविणाऱ्या या आलिशान जिमखान्यांना इतिहास आहे, हे खरे आहे. पण त्या इतिहासाच्या पुण्याईवर वर्तमानात या क्लबकडून केल्या जाणाऱ्या व्यवहारांचा लेखाजोखा मांडण्याचा निर्णय घेऊन राज्यातील फडणवीस सरकारने केलेली छाननी निश्चितच स्वागतार्ह आहे. खेळाचा विकास करण्याची उद्दिष्टे खुंटीवर टांगून केवळ प्रतिष्ठेची लक्षणे म्हणून मिरविणाऱ्या या जागांच्या वापरातील मक्तेदारीमुळे सामान्यांच्या हक्कांवर अतिक्रमण होत असेल, तर त्याबाबतीत प्रश्न उपस्थित होणे साहजिक आहे आणि त्याची सरकारला दखल घ्यावी लागली असेल तर ते साहजिकही आहे. खेळांच्या विकासासाठी मुंबईच्या दक्षिण भागातील मोक्याच्या जागांवरील प्रभावशाली सामाजिक वर्गाची पकड सैल करण्याची गरज सरकारने ओळखली हे योग्य झाले. अशा संस्थांवरील कारवाई ही केवळ स्थानिक प्रशासकीय कारवाई नसून देशभरातील सार्वजनिक मालमत्तांच्या मूल्यांकनाच्या मोहिमेचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून याकडे पाहावयास हवे. मुंबईतील सुमारे दहा जिमखाने याबाबतच्या सरकारी कारवाईच्या कक्षेत असल्याचे म्हटले जाते. मुंबईतील सगळ्यात आलिशान, श्रीमंत आणि महागड्या भागातील या क्लबच्या ताब्यात असलेल्या मालमत्तांची किंमत अब्जावधींच्या घरात असल्याचा अंदाज आहे. मात्र, या मालमत्तांमधून सरकारला मिळणारा भाडेपट्टा केवळ काही कोटींपुरता मर्यादित आहे. अशा मालमत्तांवर मक्तेदारी प्रस्थापित करून त्या काही मोजक्यांच्या मुठीत एकवटल्या असतील, तर सार्वजनिक मालमत्तांपासून सर्वसामान्य समाजास वंचित ठेवण्याच्या या सामाजिक न्यायविरोधी मक्तेदारीला आळा घालणे गैर नाही. यापैकी अनेक संस्थांच्या भाडेपट्ट्याचे करारदेखील केव्हाच संपुष्टात आले असावेत असे बोलले जाते. सरकारने त्याचीही काटेकोर शहानिशा करावयास हवी. काही प्रकरणे न्यायालयातही दाखल झाली होती, तर काहींच्या भाड्याबाबत तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. आता, दिल्ली जिमखाना क्लबवरील कारवाईनंतर या प्रक्रियेस वेग देणारे बळ महाराष्ट्र सरकारला प्राप्त होणार आहे. जनतेची जमीन काही मोजक्या धनवंतांकरिता का, हा कुजबुजत्या सुरात उमटणारा प्रश्न आता ऐरणीवर येऊ पाहत आहे. त्यामुळे एक तर, या संस्थांचे दरवाजे सर्वांकरिता समान न्यायाने खुले झाले पाहिजेत किंवा काही मोजक्यांची मक्तेदारी संपवून सरकारने न्याय्य पद्धतीने सार्वजनिक मालमत्तांवरील सुविधांचा वापर करण्याची संधी सर्वांस दिली पाहिजे. हा बदल सोपा नाही. यामध्ये अनेक अडथळ्यांची शर्यत सरकारला पार पाडावी लागणार हे स्पष्ट आहे. पण अशा शर्यतीत सामान्य माणूस सरकारसोबत असेल यात शंका नाही. म्हणूनच, हा प्रश्न आता रेंगाळत ठेवणे योग्य नाही. ▮

---

## विशेष

# भारताचे नवे स्टील धोरण

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतातील औद्योगिक विकासाच्या इतिहासात स्टील उद्योगाला नेहमीच कणा मानले गेले आहे. रेल्वेपासून महामार्ग, बंदरे, मेट्रो, संरक्षण, ऊर्जा, वाहन उद्योग, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांची उभारणी स्टीलशिवाय शक्य नाही. भारत आज जगातील दुसऱ्या क्रमांकाचा स्टील उत्पादक देश असला, तरी बदलत्या जागतिक आर्थिक आणि पर्यावरणीय वास्तवामुळे आता केवळ उत्पादनवाढ पुरेशी राहिलेली नाही. गेल्या काही दशकांमध्ये भारताने स्टील उत्पादनात मोठी झेप घेतली. स्टीलची मागणी सातत्याने वाढत गेली; मात्र भारतीय स्टील उद्योगाचा मोठा भाग अजूनही पारंपरिक कोळसा-आधारित ब्लास्ट फर्नेस पद्धतीवर अवलंबून आहे. ही पद्धत उत्पादनक्षम असली, तरी ती मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साईड उत्सर्जित करते. जगभरात हवामानबदलाचा प्रश्न गंभीर बनत असताना स्टील उद्योग हा सर्वाधिक प्रदूषण करणाऱ्या उद्योगांपैकी एक मानला जातो. जागतिक कार्बन उत्सर्जनात स्टील क्षेत्राचा सुमारे सात ते आठ टक्के वाटा असल्याचे विविध अभ्यासांमधून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता जगातील प्रमुख अर्थव्यवस्था हरित स्टील उत्पादनाकडे वळत आहेत.

युरोपीय महासंघाने कार्बन बॉर्डर अ‍ॅडजस्टमेंट मेकॅनिझमसारखे नियम लागू करण्यास सुरुवात केली आहे. यानुसार जास्त कार्बन उत्सर्जन करून तयार झालेल्या उत्पादनांवर अतिरिक्त कर लावला जाणार आहे. याचा थेट परिणाम भारतीय स्टील निर्यातीवर होऊ शकतो. भारताने वेळेत हरित उत्पादन पद्धती न स्वीकारल्यास जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मकता कमी होण्याचा धोका निर्माण होईल. सरकार २०३५ पर्यंत भारताची स्टील उत्पादन क्षमता सुमारे ४०० दशलक्ष टनांपर्यंत नेण्याचा विचार करत आहे; परंतु या विस्ताराचा केंद्रबिंदू केवळ प्रमाण नसून गुणवत्ता असेल. आतापर्यंत भारतात मोठ्या प्रमाणावर सामान्य दर्जाचे बांधकाम स्टील तयार होत होते; परंतु उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांसाठी आवश्यक असलेले स्पेशॅलिटी स्टील आणि प्रीमियम स्टील मोठ्या प्रमाणावर आयात करावे लागत होते. संरक्षण, सेमीकंडक्टर उपकरणे, इलेक्ट्रिक वाहने, अक्षय ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक अभियांत्रिकी उद्योगांना उच्च दर्जाच्या स्टीलची आवश्यकता असते. या क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भरता साधायची असेल, तर देशांतर्गत प्रीमियम स्टील उत्पादन वाढवणे अपरिहार्य ठरणार आहे.

नव्या धोरणात हरित स्टील उत्पादनाला विशेष महत्त्व दिले जात आहे. हरित स्टील म्हणजे कमी कार्बन उत्सर्जन करून तयार केलेले स्टील. यासाठी पारंपरिक कोळशाऐवजी हरित हायड्रोजन, अक्षय ऊर्जा, स्क्रॅप-आधारित इलेक्ट्रिक आर्क फर्नेस किंवा कार्बन कॅप्चर तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. भारतासाठी हे संक्रमण सोपे नाही. कारण देशातील मोठ्या स्टील कंपन्यांनी कोळसा-आधारित प्रकल्पांमध्ये हजारो कोटींची गुंतवणूक केलेली आहे. त्यात त्वरित बदल करणे आर्थिकदृष्ट्या कठीण आहे.



शिवाय हरित हायड्रोजनची किंमत अजूनही जास्त आहे. अक्षय ऊर्जेची उपलब्धता, तांत्रिक कौशल्य आणि पुरवठा साखळी यासारखी अनेक आव्हाने समोर आहेत, तरीदेखील भारताकडे काही मोठ्या संधी आहेत. देशात सौर आणि पवन ऊर्जेची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. 'हरित हायड्रोजन मिशन'द्वारे सरकार स्वच्छ इंधन उत्पादनाला प्रोत्साहन देत आहे. जर स्टील उद्योगाने या ऊर्जास्रोतांचा प्रभावी वापर केला, तर भारत कमी खर्चात हरित स्टील तयार करणाऱ्या प्रमुख देशांमध्ये स्थान मिळवू शकतो. विशेष म्हणजे विकसित देशांमध्ये ऊर्जा खर्च वाढत असताना भारताला उत्पादन खर्चात स्पर्धात्मक फायदा मिळण्याची शक्यता आहे. सरकार सार्वजनिक खरेदीत 'हरित स्टील'चा अनिवार्य वापर करण्याचाही विचार करत आहे. महामार्ग, रेल्वे, सरकारी इमारती, मेट्रो आणि ऊर्जा प्रकल्पांमध्ये हरित स्टील वापरले गेले, तर त्यासाठी मोठी बाजारपेठ तयार होऊ शकते. सुरुवातीला 'हरित स्टील'चे उत्पादन महाग असले, तरी मोठ्या प्रमाणातील मागणीमुळे खर्च कमी होण्यास मदत होईल. हा दृष्टिकोन ऊर्जा संक्रमणाच्या इतर क्षेत्रांमध्येही यशस्वी ठरला आहे. उदाहरणार्थ, सौर ऊर्जेच्या बाबतीत सुरुवातीला सरकारी प्रोत्साहनामुळेच उद्योगाला चालना मिळाली होती. नव्या धोरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आयात कमी करून देशांतर्गत उत्पादनाला चालना देणे. भारत अजूनही काही प्रकारच्या उच्च दर्जाच्या स्टीलसाठी चीन, जपान आणि दक्षिण कोरियावर अवलंबून आहे. जागतिक पुरवठा साखळीतील अस्थिरता आणि भूराजकीय तणाव लक्षात घेता हे अवलंबित्व धोकादायक ठरू शकते.

कोविड महामारीनंतर जगभरातील देशांनी धोरणात्मक उद्योगांमध्ये स्वावलंबनावर भर देण्यास सुरुवात केली आहे. स्टील क्षेत्रही त्याला अपवाद नाही; मात्र या सर्व योजनांच्या यशासाठी काही मूलभूत प्रश्न सोडवावे लागतील. भारतातील अनेक लघु आणि मध्यम स्टील उत्पादक अजूनही जुन्या तंत्रज्ञानावर चालतात. त्यांच्याकडे हरित तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक भांडवल नाही. धोरण केवळ मोठ्या उद्योगसमूहांपुरते मर्यादित राहिले, तर लहान उद्योग अडचणीत येऊ शकतात. त्यामुळे सरकारने आर्थिक साहाय्य, करसवलती, तांत्रिक मदत आणि स्वस्त वित्तपुरवठा यासारख्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कच्चा माल. भारताकडे लोखंड, खनिजाचा मोठा साठा असला तरी उच्च दर्जाच्या कोकिंग कोळशासाठी मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते. हरित स्टीलकडे संक्रमण करताना स्क्रॅप पुनर्वापर उद्योग विकसित करणे आवश्यक ठरेल. सध्या भारतातील स्क्रॅप संकलन आणि प्रक्रिया व्यवस्था विस्कळीत आहे. भविष्यात परिपत्र अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून स्क्रॅप-आधारित उत्पादन वाढवणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. मानवी संसाधनांचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. हरित स्टील उद्योगासाठी नव्या प्रकारच्या तांत्रिक कौशल्यांची गरज भासणार आहे. अभियंते, ऊर्जा तज्ज्ञ, हायड्रोजन तंत्रज्ञानातील प्रशिक्षित मनुष्यबळ आणि डिजिटल ऑटोमेशन तज्ज्ञ यांची मोठी मागणी निर्माण होईल. त्यामुळे कौशल्य विकास कार्यक्रमांना नव्या धोरणाशी जोडणे आवश्यक ठरेल. या धोरणाचा आणखी एक व्यापक परिणाम म्हणजे भारताच्या हवामान धोरणावर निर्माण होणारा प्रभाव. भारताने २०७० पर्यंत नेट-झीरो उत्सर्जनाचे लक्ष्य जाहीर केले आहे. हे लक्ष्य साध्य करायचे असेल तर ऊर्जा, वाहतूक आणि उद्योगक्षेत्रात मोठे बदल करावे लागतील. त्यात स्टील उद्योगाचे योगदान निर्णायक असेल. भारताने स्टील क्षेत्रातील उत्सर्जन लक्षणीयरीत्या कमी केल्यास जागतिक हवामान चर्चांमध्ये देशाची विश्वासार्हता वाढेल. तथापि, केवळ धोरण जाहीर करून उद्दिष्टे साध्य होत नाहीत. हरित स्टीलच्या बाबतीत अशीच परिस्थिती उद्भवू नये, यासाठी केंद्र-राज्यांत समन्वय आवश्यक असेल.

पर्यावरण मंजुरी, ऊर्जा उपलब्धता, जमीन अधिग्रहण, संशोधन आणि विकास, वित्तपुरवठा आणि निर्यात धोरण या सर्व बाबींमध्ये सुसंगत दृष्टिकोन आवश्यक आहे. भारतातील मोठ्या स्टील कंपन्यांनी आधीच हरित तंत्रज्ञानात गुंतवणूक सुरू केली आहे. काही कंपन्या हायड्रोजन-आधारित उत्पादनाचे प्रयोग करत आहेत, तर काही कार्बन कॅप्चर आणि पुनर्वापर तंत्रज्ञानावर काम करत आहेत; परंतु जागतिक स्तरावर स्पर्धा करायची असेल, तर संशोधन आणि नवकल्पनांमध्ये आणखी मोठी गुंतवणूक करावी लागेल. भारताने केवळ तंत्रज्ञान आयात करणारा देश न राहता तंत्रज्ञान विकसित करणारा देश बनणे गरजेचे आहे. नवे राष्ट्रीय स्टील धोरण हे भारताच्या औद्योगिक परिवर्तनातील महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. हे धोरण योग्य पद्धतीने राबवले गेल्यास भारताला केवळ उत्पादनवाढ नाही तर उच्च दर्जाचे, पर्यावरणपूरक आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक औद्योगिक राष्ट्र म्हणून उभे राहण्याची संधी मिळू शकते; त्यासाठी दीर्घकालीन दृष्टी, सातत्यपूर्ण गुंतवणूक आणि उद्योग-सरकार यांच्यात प्रभावी सहकार्य आवश्यक असेल. एके काळी औद्योगिक क्रांतीचे प्रतीक असलेले स्टील आता हरित अर्थव्यवस्थेच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. भारताने या संक्रमणात पुढाकार घेतला, तर ते आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरेलच, पण भविष्यातील पिढ्यांसाठी अधिक शाश्वत विकासाचा मार्गही खुला करेल. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

---


## वेध

**नितीन शिरसाट**

# मंदिरांना पौष्टिक अन्नसेवा; स्वागतार्ह निर्णय

भारत हा श्रद्धा, अध्यात्म आणि सांस्कृतिक परंपरांचा देश म्हणून ओळखला जातो. देशभरातील हजारो मंदिरे, मठ, देवस्थाने, गुरुद्वारे, तीर्थक्षेत्रे दरवर्षी कोट्यवधी भाविकांना आकर्षित करतात. धार्मिक पर्यटन स्थळी भाविकांची संख्या वाढत असताना आवश्यक मूलभूत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसून येते. केंद्र शासनाने अलिकडेच धार्मिक स्थळांवर दर्जेदार व पौष्टिक अन्नसेवा उपलब्ध व्हावी यासाठी शेगाव आणि शिर्डी येथे फूड स्ट्रीट हब उभारण्यास मंजुरी दिली आहे. हा निर्णय स्वागतार्ह असला तरी महाराष्ट्रातील इतर प्रमुख धार्मिक स्थळांवरील सेवा सुविधांच्या अभावाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

केंद्र सरकारच्या फूड स्ट्रीट योजनेंतर्गत विदर्भातील प्रसिद्ध शेगाव आणि मराठवाडा विभागातील शिर्डी येथे फूड स्ट्रीट हबला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत दोन्ही धार्मिक स्थळी प्रत्येकी १ कोटी या प्रमाणे २ कोटी रुपयांचा निधी केंद्राच्या वतीने उपलब्ध करून दिला जाणार आहे. या निधीतून फूड स्ट्रीट हब सेंटर लोकांच्या सेवेसाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. रस्त्यावरील खाद्यपदार्थामुळे होणारे आजार, अन्नातून होणारी विषबाधा रोखण्यासाठी अन्न हाताळण्याची सुरक्षित मानके देशभर लागू करण्यात आली आहेत. शिवाय लघु व्यावसायिक विक्रेत्यांना रोजगाराची चालना मिळणार आहे. महाराष्ट्रातील अनेक महत्त्वाच्या धार्मिक स्थळांवर आजही भाविकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर, कोकण किनारपट्टीवरील गणपतीपुळे, तुळजापूरचे भवानी मंदिर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, सप्तशृंगी गड, पंढरपूर यासारख्या ठिकाणी लाखो भाविक वर्षभर येत असतात. परंतु अनेक ठिकाणी स्वच्छ शौचालयांची कमतरता, पिण्याच्या पाण्याची अपुरी व्यवस्था, वाहनतळांची गैरसोय, सामान ठेवण्याची सुविधा नसणे, रांगा व्यवस्थापनातील त्रुटी आणि परवडणाऱ्या भोजनव्यवस्थेचा अभाव ही गंभीर समस्या आहे.



विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या गरीब मध्यमवर्गीय भाविकांना या अडचणींचा सर्वाधिक फटका बसतो. श्रद्धेने देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांना दर्शनापेक्षा सुविधांच्या शोधात अधिक वेळ घालवावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. धार्मिक स्थळांच्या परिसरात वाढत्या व्यावसायिकीकरणामुळे भाविकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. स्थानिक नगर पालिका, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद परिसरातील जागेत वाहनतळासाठी तासाला पैसे मोजावे लागतात. निवास व्यवस्था, भोजन यासाठी अनेकदा अवास्तव दर आकारले जातात. काही ठिकाणी दरफलक नसणे, अधिकृत नियंत्रणाचा अभाव, मध्यस्थांची साखळी यामुळे भाविकांना जास्त पैसे मोजावे लागतात. श्रद्धा आणि भक्तीचा गैरफायदा घेतला जात असल्याची भावना निर्माण होते. धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनात पारदर्शकता उत्तरदायित्व वाढविणे ही काळाची गरज आहे. तर दुसरीकडे दर तासाला होणारी मंदिर परिसरातील स्वच्छता, शुद्ध पिण्याचे पाणी, पादत्राणे ठेवण्याची स्वतंत्र व्यवस्था, सुलभ शौचालय, पाण्याची व्यवस्था, दररोज तीर्थप्रसाद, अन्नदान, ठिकठिकाणी पंखे, कूलरची थंड हवा, वयोवृद्ध, लहान मुलांसाठी स्वतंत्र दर्शनाची सुविधा यासाठी देशभरात प्रसिद्ध असलेले विदर्भाची पंढरी संतनगरी श्री गजानन महाराज संस्थान शेगाव, अमृतसर येथील सुवर्ण मंदिर किंवा काही मोठ्या संस्थानांप्रमाणे सर्व भाविकांना मोफत अत्यल्प दरात पौष्टिक भोजन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था राज्यातील सर्व प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये असणे आवश्यक आहे. अन्नछत्रामुळे सर्वसामान्य भाविकांना मोठा दिलासा मिळतो. श्रद्धेच्या ठिकाणी सामाजिक समतेचाही संदेश दिला जातो. अनेक धार्मिक स्थळांवर स्वच्छता सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यासाठी शुल्क आकारले जाते. काही ठिकाणी पादत्राणे ठेवण्यासाठी, सामान ठेवण्यासाठी, वाहन पार्किंगसाठी अगदी शौचालय वापरण्यासाठी पैसे मोजावे लागतात. भाविकांच्या दृष्टीने हा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड आहे. देवदर्शनासाठी आलेल्या वृद्ध, महिला, दिव्यांग आणि लहान मुलांसोबत आलेल्या कुटुंबांना या सुविधांची सर्वाधिक गरज असते. यासाठी केंद्र व राज्य सरकारने पुढाकार घेऊन भाविकांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध संस्थांनचे विश्वस्त, समिती, पंचकमिटी यांच्याशी बैठकीतून संवाद साधून मार्ग काढणे आवश्यक आहे. ▮

९८८१७१७८२८

---

## इतस्ततः

# नीट न जमणारी 'नीट'ची परीक्षा

**दत्तात्रेय आंबुलकर**

गेल्या काही वर्षांप्रमाणे यंदाही वैद्यकक्षेत्रातील पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेली 'नीट' ही प्रवेश परीक्षा गाजली व गाजत आहे, ती त्यातील पेपरफुटीमुळे. यंदाच्या 'नीट'च्या पेपरफुटीचे धागेदोरे विविध राज्यांमध्ये अगदी व्यावसायिक स्वरूपात व वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेचे व्यापारीकरण करणारे बनल्याचे उघडकीस आले. परिणामी, 'नीट'च्या प्रवेश प्रक्रिया व त्यातील व्यवसायी ढिसाळपणाला देशपातळीवर विरोध झाला. पालकांपासून पुढाऱ्यांपर्यंत 'नीट' पेपरफुटीला कडाडून विरोध झाल्यामुळे सरकारला ही प्रवेश प्रक्रिया पुन्हा व नव्याने घेण्याचा निर्णय घेणे क्रमप्राप्त व अपरिहार्य होते व झालेही तसेच.पेपरफूट व त्यापोटी देशपातळीवरील 'नीट'च्या फेरपरीक्षेमुळे यावर्षीच्या प्रवेश परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना चक्कर येणे व त्यांच्या पालकांना घाम फुटण्यासारखी स्थिती निर्माण होणे हे म्हणा तसे स्वाभाविकच होते. यामागची संबंधित विद्यार्थी-उमेदवारांची सद्य:स्थितीतील मन:स्थिती म्हणजे, त्यांनी काही वर्षांपासून आपल्या डॉक्टर होण्याच्या इच्छा आणि जिद्दीपोटी केलेले प्रयत्न आणि तयारीवर फेरपरीक्षेने पाणी फेरले. त्याचवेळी त्यांच्या पालकांनी फार मोठी रक्कम मोजून आपल्या मुलाला वा मुलीला डॉक्टर बनविण्याच्या स्वप्नापोटी विविध प्रमुख शहरांतील व विशेषत: राजस्थानच्या कोटा, जयपूर, सीकर यासारख्या इंजिनीअरिंगसह वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशाची मोठी व प्रमुख व्यापारी केंद्रे ठरलेल्या ठिकाणी विद्यार्थ्यांना 'नीट' परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी केलेला लाखो रुपयांचा खर्च आज मातीमोल ठरला आहे. फेरपरीक्षेमुळे या विद्यार्थी-पालकांसमोर सध्या उरलेला एकमेव पर्याय म्हणजे, फेरपरीक्षेच्या फेरतयारीच्या दरम्यानच्या कालावधीत त्यांच्या आशा-आकांक्षांचा पालापाचोळा झालेला असून, संबंधित विद्यार्थी नैराश्य व वैतागासह परीक्षेच्या फेरतयारीला लागले असून, त्यांच्या पालकांना काळजीयुक्त परिस्थितीत व प्रसंगी निद्रानाशासह आपल्या मुलांच्या स्वप्नांचा झालेला नाशच जणू पाहावा लागत आहे. 'नीट'ची प्रवेश परीक्षा नीट न झाल्याचीच, ही सध्यातरी त्यांच्या न संपणाऱ्या भयाची परिणती ठरली आहे.

या संदर्भातील संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे म्हणजे, यावर्षी ३ मे रोजी देशातील लाखो विद्यार्थ्यांनी वैद्यक क्षेत्रातील आपल्या करीअर-स्वप्नपूर्तीची सुरुवात म्हणून 'नीट' प्रवेश पात्रता देण्याती पूर्वतयारी केली होती. याची मोठी तयारी त्यांनी गेल्या एक-दोन वर्षांत केली होती व त्यासाठी त्यांच्या पालकांनी लाखांवर रक्कम खर्च केली होती, गुंतवली होती.

या परीक्षार्थी-विद्यार्थ्यांची या दरम्यानची पृष्ठभूमी, मानसिकता म्हणजे यापैकी अधिकांश जणांनी आपले घर आणि पालकांपासून अनेक महिने व वर्षे दूर राहून 'नीट'ची मेहनत घेऊन प्रयत्नपूर्वक पूर्वतयारी केलेली. यासाठी बहुधा सर्वांनीच खर्चीक क्लासेस लावून विविध परीक्षा-चाचण्या दिल्या. त्यासाठी प्रसंगी रात्रंदिवसही अभ्यास केला. अशा प्रकारे 'नीट' प्रवेश परीक्षेची तयारी व पूर्वाभ्यास केल्यानंतरच्या कालावधीत या विद्यार्थ्यांना हायसे वाटले. परगावी वा घरापासून दूर राहून विशेष अभ्यास करणाऱ्यांनी परीक्षेच्या अपेक्षित तारखेच्या आधी मिळालेले काही दिवस घरी व आपले पालक-नातेवाईकांसह व मित्रांसह घालविण्यासाठी घरी पोहोचले, तर मोठ्या शहरातील 'नीट'ची तयारी करणारे मोठ्या शहर वा महानगरातील विद्यार्थी 'नीट'च्या पूर्वतयारीचा ताण कमी झाल्याने काहीसे खूश झाले. मात्र, 'नीट'ची तयारी पूर्ण करणाऱ्या या विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला, तो 'नीट' प्रवेश परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे, 'नीट' परीक्षाच रद्द करण्यात आल्याच्या बातमीने. यातूनच या विद्यार्थ्यांना गेले बरेच महिने वा काही वर्षे सर्व प्रकारे प्रयत्न करून केलेली तयारी व मोठे प्रयत्न अशा प्रकारे अचानक व अनपेक्षितरीत्या बेकार झाल्याचे मोठे शल्य होते, तर पालकांसाठी आपल्या मुला-मुलीला डॉक्टर बनविण्याच्या स्वप्नपूर्ततेसाठी फार मोठा खर्च करून व त्यांना प्रसंगी घरापासून दूर ठेवून, विशेष तयारी करण्यासाठी सर्व प्रकारे प्रोत्साहन देणाऱ्या पालकांमध्ये हतबलता आली. 'नीट'साठी वर्षानुवर्षे विद्यार्थ्यांची तयारी करवून घेण्यासाठी मोठी राशी घेणाऱ्या, बहुतांश मार्गदर्शन करणाऱ्या संस्थाचालकांच्या चेहऱ्यावरची रया गेली; तर पोलिस-प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी व संबंधित मंत्री व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा पुरतेपणी गोंधळ उडाला. छेपरफूट व 'नीट' परीक्षाच रद्द होणे, या घटकांनी या विषयाशी संबंधित विविध घटकांमधील गोंधळ प्रदीर्घ काळ कायम राहिला. एवढेच नव्हे, तर 'नीट'ची यावेळची पेपरफुटी केरळम्पासून उत्तराखंडपर्यंत विविध राज्यांमध्ये उघड झाल्याने या शैक्षणिक-प्रशासकीय गोंधळाला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. यावेळी 'नीट'च्या झालेल्या पेपरफुटी व गोंधळामुळे विद्यार्थ्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणात नैराश्य पसरले आहे. पालक हतबल झाल्यामुळे यापैकी बऱ्याच विद्यार्थ्यांना आलेल्या नैराश्यातून सावरण्यासाठी काही ठिकाणी तर मानसशास्त्र व मानसोपचारतज्ज्ञांची मदतसुद्धा घ्यावी लागली. एवढेच नव्हे, तर नैराश्यातील या विद्यार्थ्यांना बसलेला धक्का आणि दु:खातून बाहेर काढून 'नीट' फेरपरीक्षेसाठी मानसिकदृष्ट्या तयार करण्याचे मोठे दिव्य यासाठी पार पाडावे लागेल. 'नीट'ची तयारी करणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, प्रशिक्षक-मार्गदर्शक या साऱ्यांनी मान्य केले आहे की, भूकंपाच्या धक्क्यांप्रमाणेच यंदाचा 'नीट'च्या पेपरफुटीचा धक्का सर्वाधिक तीव्रतेचा ठरला. अधिकांश विद्यार्थ्यांचा यामुळे प्रयत्न-परिश्रम व अभ्यास-प्रयास यावरील विश्वासच उडाला असून, त्यांना नव्याने परीक्षेसह परिस्थितीला सामोरे जाणे अवघड ठरले आहे. पालकांपुढील जटिल प्रश्न म्हणजे, यात आमचे व आमच्या मुलांचे काय चुकले? 'नीट'ची परीक्षा नीट न झाल्याने या साऱ्यांपुढे निर्माण झालेल्या भयप्रद परिस्थितीमुळे त्यांचे भय आणि भीती अद्याप कायम आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

---

### फक्त शिक्षित नव्हे, सुसंस्कृत पिढी घडविण्याची वेळ

अभ्यासासोबत संस्कार शिक्षणाची आवश्यकता असून शिक्षण क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल शिक्षण, स्पर्धात्मक परीक्षा आणि करीअरकेंद्रित अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. मात्र या सर्व प्रगतीच्या प्रवाहात नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव, शिस्त, संयम आणि मानवी संस्कार यांचा पाया कमकुवत होत असल्याची चिंता पालक, शिक्षक आणि समाजातील अनेक घटक व्यक्त करत आहेत. विद्यार्थी गुणांच्या स्पर्धेत पुढे जाण्यासाठी प्रयत्नशील आहेत, परंतु चांगला माणूस घडविण्यासाठी आवश्यक असलेले संस्कार आणि नैतिक शिक्षण अनेकदा दुर्लक्षित राहते. आज समाजात वाढणारी असहिष्णुता, वडिलधाऱ्यांप्रति कमी होत असलेला आदर, सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी होणे आणि व्यसनांसारख्या समस्यांकडे आकर्षण वाढणे ही चिंतेची बाब आहे. या पृष्ठभूमीवर प्रत्येक शाळेत नियमित अभ्यासक्रमासोबत संस्कार प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याची मागणी रास्त आणि काळाची गरज ठरते. पुस्तकातील ज्ञान विद्यार्थ्यांना यशस्वी बनवू शकते, परंतु संस्कार त्यांना संवेदनशील, जबाबदार आणि आदर्श नागरिक बनवतात. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास जितका महत्त्वाचा आहे, तितकाच त्यांच्या चारित्र्याचा विकासही महत्त्वाचा आहे. शाळांमध्ये नैतिक शिक्षण, भारतीय संस्कृतीची ओळख, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, सामाजिक बांधिलकी, राष्ट्रप्रेम आणि शिस्त यांसारख्या विषयांवर नियमित मार्गदर्शन दिल्यास विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडू शकतो.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

## वाचक पत्रे

### स्वर सुमन निमाले

ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांचे ३१ मे २०२६ रोजी वयाच्या ८९व्या वर्षी मुंबई येथे निधन झाले. हिंदी, मराठी, बंगाली, गुजराती, आसामी, कन्नड आणि इतर अनेक भाषांमध्ये त्यांनी गाणी गायिली. त्यांच्या मधुर, सोज्वळ आणि भावस्पर्शी आवाजामुळे अनेकदा त्यांची गाणी लता मंगेशकर यांच्या आवाजाशी गल्लत केली जात असे. 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे', 'जिथे सागरा धरणी मिळते', 'केतकीच्या बनी', 'ना ना करते प्यार' यासारखी असं'य अजरामर गीते त्यांनी संगीतविश्वाला दिली. मोहम्मद रफी, किशोर कुमार, मुकेश, मन्ना डे यासारख्या दिग्गजांसोबत त्यांनी अनेक संस्मरणीय युगुलगीते गायिली. सात दशकांहून अधिक काळ चाललेल्या त्यांच्या संगीतप्रवासाने भारतीय चित्रपटसंगीत आणि भावसंगीत समृद्ध केले. त्यांचा स्वर, साधेपणा आणि संगीतवारसा सदैव जिवंत राहील. सुमन कल्याणपूर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**माधव ताटके**/पुणे

●● ●●

### ऊर्जा वापरातील विषमता चिंताजनक

अलिकडेच जागतिक ऊर्जा व्यवस्थेमध्ये एक अत्यंत अस्वस्थ करणारे चित्र ऑक्सफॅमच्या अहवालातून जगापुढे मांडण्यात आले. एकीकडे जगभरातील कोट्यवधी कुटुंबे वाढत्या वीज बिलाच्या ओझ्याखाली दबत आहेत, तर दुसरीकडे इंधन कंपन्यांचा नफा प्रत्येक सेकंदाला नवनव्या उंचीवर जात आहे. २०२६ मध्ये जगातील सहा सर्वांत मोठ्या इंधन कंपन्या दर सेकंदाला तब्बल २९६७ डॉलर म्हणजे सुमारे अडीच लाख रुपयांचा नफा कमावणार आहेत. या अहवालामुळे आर्थिक विरोधाभासाचे चित्रही स्पष्ट झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या कंपन्यांना नफ्यामध्ये दररोज सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांची वाढ होत आहे आणि एकत्रित वार्षिक नफा ८.९ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. इंधन कंपन्यांच्या नफ्यातून आफ्रिका खंडातील पाच कोटी लोकांना सौर ऊर्जा उपलब्ध करून देता येऊ शकेल. जे जगभरातील देश आज ऊर्जा संकटाशी झुंज देत आहेत. तिथे हा नफा प्रकाश पोहोचवू शकतो. मात्र, तसे न होता सध्या हा अफाट पैसा मूठभर लोकांच्या संपत्तीत आणखी भर घालत चालला आहे. सर्वेक्षणानुसार तिपटीपेक्षा अधिक लोकांना असे वाटते की, सरकारांनी जीवाश्म इंधनाचे उत्पादन वाढवण्याऐवजी नवीकरणीय ऊर्जेत गुंतवणूक करावी. मोठ्या तेल, गॅस कंपन्यांना नफ्यावर अधिक कर लावला जावा आणि त्या पैशातून स्वच्छ ऊर्जेच्या दिशेने वाटचाल व्हावी. आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंधन कंपन्या त्याच्या अगदी उलट दिशेने वाटचाल करत आहेत, हे चिंताजनक आहे. ▮

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परळीत तीन गावात त्रेचाळीस गटात दोनशे बासष्ट एकर जमीन तलाठ्यांनी वाढवली

## तलाठी आणि मंडळ अधिकारी जेलमध्ये घाला : ॲड. अजित देशमुख



बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यात कधी काय होईल हे सांगता येत नाही. बोगस पिक विमा, लागत नसताना रेल्वेसाठी अतिरिक्त जमिनीचे संपादन, अशा अनेक घटनानंतर आता परळी तालुक्यातील तीन गावांमध्ये फक्त त्रेचाळीस गटांच्या सातबारा मध्ये अस्तित्वात नसलेल्या जमिनीच्या मालकांची नावे तलाठ्यांनी बोगस रीतीने लावले आहेत. या सातबाराचा आधार घेऊन हे बोगस लोक पीक कर्ज, पिक विमा आणि इतर सर्व लाभ घेत असल्याचे समजते. त्यामुळे सर्व दोषींना जेल मध्ये घालावे, असे जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

बीड जिल्हा सातत्याने भ्रष्ट कामात गाजत आहे. त्यात आता नवीन मार्ग निवडत पिक विमा आणि पीक कर्जासाठी ही पळवाट शोधली जात असून बोगस पिक विमा घेणे आणि बोगस कर्ज घेऊन कर्जमाफी मिळवणे, असा उद्योग चालू असल्याची ही तक्रार आहे. प्रशासनातील तलाठी, मंडळ अधिकारी आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणारे तहसीलदार हे सर्व यात सहभागी असल्याचे देखील देशमुख यांनी म्हटले आहे. तक्रार झाल्यानंतर ताबडतोब ही नावे आणि वाढलेली शेती कमी व्हायला पाहिजे. परंतु प्रशासन पातळीवर हे केले जात नाही. चौकशीचा फक्त फार्स दाखवला जातो. यावरून भ्रष्ट प्रशासन जोपर्यंत सुधरत नाही, तोपर्यंत बीड जिल्हा सुधारणार नाही, असेही ॲड. देशमुख यांनी म्हंटले आहे.

परळी तालुक्यातील धर्मापुरी, दैठणा आणि हेळम या तीन गावाची माहिती देशमुख यांना मिळाली आहे. यापैकी धर्मापुरी या गावातील एकूण १४५४ गट क्रमांक पैकी १३ गट क्रमांक मध्ये २६० एकर जमीन वाढली आहे. त्याचबरोबर दैठणा घाट या गावात एकूण ४९८ गट नंबर मधील १६ गट नंबर मध्ये ९५ एकर ३० गुंठे जमीन वाढली आहे. आणि हेळम या गावात ७८७ पैकी १४ गटांमध्ये ९३ एकर ९४ एकर ४७ गुंठे जमीन वाढली आहे म्हणजेच माहिती मिळालेल्या ४३ गटांमध्ये २६२ एकर जमीन वाढली आहे.

या वाढलेल्या क्षेत्राच्या आधारे किती लोकांनी कोणत्या पिकाचा पिक विमा भरलेला आहे ? त्यांनी पीक विम्याचा लाभ घेतला आहे का ? त्याचप्रमाणे यातील किती बोगस नाव वाल्यांनी तलाठ्याशी पीक पेरा संगनमताने पीक कर्ज घेतलेली आहे, हे पीक कर्ज वसूल झाले आहे का ? यांची नावे पीक कर्जमाफीमध्ये आहेत का ? या बाबीची तपासणी आवश्यक आहे. बीड जिल्ह्यातील हा प्रकार तपासल्याशिवाय पिक कर्ज माफी देणे चुकीचे होणार आहे. शेतकऱ्यांना तात्काळ माफी द्या, मात्र बोगस लोकांना माफी न देता तात्काळ कर्ज व्याजासह वसुल करा, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

धर्मापुरी येथील कार्यकर्ते सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी रवींद्र मुंडे यांनी ही बाब गेल्या काही महिन्यांपासून तलाठी, मंडळ अधिकारी, तहसीलदार यांना सांगितली आहे. त्यांनी याबाबत विचार तक्रार दाखल करून पोहोच देखील घेतली आहे. मात्र प्रशासन पातळीवर ही तक्रार अजून प्रलंबित असल्याने रवींद्र मुंडे यांनी ॲड. देशमुख यांचे कडे या प्रकरणात मदत मागितली असून शासनाची फसवणूक थांबवण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान भ्रष्टाचाराचे सर्व प्रकार शिकायचे असतील तर त्या व्यक्तीने बीड जिल्ह्यात काही दिवस रहायला हवे. बीड जिल्ह्यात प्रशासन देखील किती भ्रष्ट असू शकते याची अनेक नमुने आपण उघडकीस आणले असून हा नवा नमुना आता उघडकीस आणणार असल्याचे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

दरम्यान या गंभीर प्रकाराची तक्रार ॲड. देशमुख यांनी पुराव्यासह जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कडे दाखल केली आहे. त्याचप्रमाणे शासनाकडे देखील याबाबत तक्रार देण्यात आली आहे.

गावागावातील कार्यकर्त्यांनी भ्रष्ट कारभार रोखण्यासाठी रवींद्र मुंडे यांच्या प्रमाणे पुढे यावे, असे आवाहन देखील देशमुख यांनी केले आहे.

## संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

**केज :** केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये थोर समाज सुधारक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाचे उच्च दर्जाचे शिक्षण देणारी श्री संस्कार इंग्लिश स्कुल मध्ये थोर समाज सुधारक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम आहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी अभिवादन करुन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जिवनकार्यावर गौरोद्गार काढले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या जेष्ठ शिक्षीका रेश्मा गायकवाड या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील शिक्षिका प्रियंका शिंदे, वैष्णवी काळे, सायली गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे हे होते.

# अधिक मासाच्या पावन पर्वावर बीडमध्ये भक्तीचा महापूर!

## विश्वकल्याणार्थ ९० दांपत्यांच्या उपस्थितीत 'पंचकुंडीय भव्य विष्णूयाग' संपन्न

**बीड:**अमृताहुनी गोड अशा पुरुषोत्तम (अधिक) मासाचे औचित्य साधून, सकल पुरोहित वर्गाच्या वतीने दिनांक १ आणि २ जून रोजी आयोजित करण्यात आलेला 'भव्य विश्वकल्याणार्थ पंचकुंडीय विष्णूयाग' अत्यंत मंगलमय आणि उत्साही वातावरणात संपन्न होत आहे. जागतिक शांतता, आरोग्य आणि जनकल्याणाचा उदात्त हेतू ठेवून झालेल्या या महायज्ञात तब्बल ९० दांपत्यांनी मुख्य यजमान म्हणून सहभाग घेतला. वेदघोषांच्या जयघोषाने आणि विष्णू सहस्त्रनामाच्या मंत्रोच्चाराने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

पाच यज्ञकुंडांतून उमटले विश्वकल्याणाचे सूर

'यज्ञो वै विष्णुः' या वैदिक सिद्धांतानुसार, संपूर्ण विश्वाचे पालनकर्ते भगवान श्री लक्ष्मी-नारायणाला प्रसन्न करण्यासाठी या पंचकुंडीय विष्णूयागाचे



आयोजन करण्यात आले होते. विधीच्या दोन्ही दिवशी मुख्य मंडपात पाच भव्य यज्ञकुंडांची स्थापना करण्यात आली होती. आचार्य आणि पुरोहित वर्गाच्या मार्गदर्शनाखाली, योग्य शास्त्रोक्त पद्धतीने अग्नी प्रज्वलित करून यज्ञाला सुरुवात झाली.

**सामूहिक आहुती:** अभूतपूर्व सोहळा.

या विष्णूयागाचे मुख्य आकर्षण म्हणजे समाजातल्या विविध स्तरांतून आलेले ९० दांपत्य होते. पारंपरिक पोशाखात सज्ज झालेल्या या ९० जोडप्यांनी विष्णू सहस्त्रनामाच्या प्रत्येक नामावर 'स्वाहा' म्हणत यज्ञामध्ये आहुती अर्पण केली. जेव्हा ९० दांपत्यांनी एकाच वेळी, एकाच लयीत आणि एकाच भावनेने विश्वकल्याणासाठी अग्नीला द्रव्य समर्पित केले, तो क्षण उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला.

वातावरण झाले मंत्रमुग्ध आणि सात्त्विक

यज्ञ मंडपातून निघणारा सुगंधी धूर आणि विष्णू सहस्त्रनामाच्या १००० मंत्रांचे दिव्य कंपने (Vibrations) यामुळे संपूर्ण परिसरातील नकारात्मकता नष्ट होऊन एक अलौकिक सात्त्विक ऊर्जा निर्माण झाली होती. पुरोहित वर्गाने अत्यंत शुद्ध उच्चारांमध्ये केलेल्या वेदपठणामुळे वातावरणात जणू प्रत्यक्ष वैकुंठ उभे राहिल्याचा भास होत होता.

हा संपूर्ण कार्यक्रम बीड मधील श्रीमद् जानीजनार्दन संस्थान थोरले पाटांगण या ठिकाणी संपन्न होत असून उद्या यज्ञाची पूर्णाहुती होऊन ठीक ११ वाजता आचार्य अमृताश्रम स्वामी महाराजांचे आशीर्वाचन होणार आहे व नंतर महाप्रसादाचे आयोजन केले आहे, कृपया सर्वांनी प्रवचनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन सकल पुरोहित वर्गाकडून करण्यात आले आहे.

## 'मेरी बात' कार्यक्रमात गोरख शेंद्रे यांचे प्रेरणादायी मनोगत

**अंबाजोगाई :** आंतरभारती संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'मेरी बात' या विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक, कथाकार, कवी तथा माजी मुख्याध्यापक गोरख शेंद्रे यांनी आपल्या जीवनप्रवासातील विविध अनुभव आणि साहित्य-सामाजिक कार्याचा प्रेरणादायी प्रवास उपस्थितांसमोर उलगडला.





बालक मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना त्यांनी आपल्या बालपणापासून ते शिक्षक आणि साहित्यिक म्हणून घडत गेलेल्या प्रवासाचा आढावा घेतला. इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतचे शिक्षण परडी-माटेगाव येथे झाले. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही जिद्द, परिश्रम आणि शिक्षणाच्या बळावर त्यांनी शिक्षक म्हणून आपली कारकीर्द घडवली.

शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शिक्षण क्षेत्रातील अनुभवांमधून त्यांनी कथा लेखनास सुरुवात केली. पुढे कथासंग्रह, कवी संमेलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. याशिवाय वृक्षारोपण, साक्षरता अभियान आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

आंतरभारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा आंतरभारती व मराठवाडा साहित्य परिषदेसोबतचा प्रवास अधिक समृद्ध झाला. साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या सहवासातून मिळालेले अनुभव त्यांनी यावेळी उपस्थितांसोबत शेअर केले.

कार्यक्रमास साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी गोरख शेंद्रे यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन व्यंकटेश जोशी यांनी केले.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीप्रकरणी घाटनांदूरच्या ग्रामविकास अधिकाऱ्याविरोधात कारवाईची मागणी

**अंबाजोगाई :** घाटनांदूर (ता. अंबाजोगाई) येथील ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश फड यांच्याविरोधात सकल धनगर समाजाच्या वतीने पंचायत समिती अंबाजोगाईचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले असून, त्यांना तात्काळ कार्यमुक्त करून शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, दि. 31 मे 2026 रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती देशभरात आणि महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शासनाच्या नियमांनुसार महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमांना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित असताना घाटनांदूर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश फड हे अनुपस्थित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, त्यांच्या अनुपस्थितीबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी उध्दट व बेजबाबदार भाषेत उत्तर दिल्याचा तसेच समाजाच्या भावना दुखावतील असे वक्तव्य केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे धनगर समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून संबंधित अधिकाऱ्यांचे वर्तन शासकीय सेवकाला शोभणारे नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सकल धनगर समाजाने आपल्या निवेदनात महेश फड यांना कर्तव्यकसुरी व समाजाचा अपमान केल्याबद्दल तात्काळ सेवेतून कार्यमुक्त करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करून शासकीय नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय शासकीय पदाचा गैरवापर करून सामाजिक तेढ निर्माण केल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनामुळे घाटनांदूर परिसरात चर्चा रंगली असून प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

# शेतकऱ्यांशी दगाबाजी करणाऱ्या ओंकार कारखान्या विरोधात पुन्हा एल्गार !

## ऊस उत्पादक संघर्ष समिती कारखान्या समोर बेमुदत अंदोलन सुरु



**परळी वै ता 1 प्रतिनिधी :** गाळपाच्या शुभारंभाच्या वेळी परळीच्या ओंकार साखर कारखान्याने २९५० रुपये ऊसदर जाहिर केला. पंरतु ऐन वेळी पलटी मारत शेतकऱ्यांशी दगाबाजी केली. २९५० रूपये प्रतिटन ऊस दर जाहिर करुन शेतकऱ्यांना केवळ प्रतिटन १८०० रुपया प्रमाणे पैसे खात्यात वर्ग केले.शेतकऱ्यांना सदरील कारखान्याने दिलेला हा धोका आहे. या मुळे ऊस उत्पादक संघर्ष समिती व शेतकरी आक्रमक व संतप्त झाले आहेत. जाहिर दरा प्रमाणे ऊसबील व वाहतूक ठेकेदारांची बिले द्यावीत यासाठी ८ मे रोजी ऊस उत्पादक संघर्ष समितीने कारखान्या समोर ठिय्या सत्याग्रह आंदोलन केले होते. दरम्यान कारखान्याने अंदोलन कर्त्यांना लेखी पत्र देत जाहिर दरा प्रमाणे ऊस बिले व वाहतूक ठेकेदारांची बिले दिनांक २५ मे २०२६ च्या अगोदर देऊ असे लेखी अश्वस्थ

केले. पंरतु सदरील तारीख निघून गेली तरी बिल काही जाहिर दराप्रमाणे निघाले नाही. अखेर या मुळे ऊसउत्पादक शेतकरी संघर्ष समितीने अंदोलनाचे शस्त्र उपसत पुन्हा एकदा ओंकार कारखान्या पुढे अंदोलन सुरु केले आहे. काल दिनांक १ जून पासून ओंकार कारखान्या पुढे मोठ्या संख्येने ऊस उत्पादक संघर्ष समिती शेतकऱ्यां समावेत बसले आहेत. जो पर्यंत जाहिर दराप्रमाणे बिले काढल्या जात नाहीत तो पर्यंत हे अंदोलन सुरुच राहिल असा ठाम निर्धार ऊस उत्पादक संघर्ष समितीचे कॉ अजय बुरांडे ॲड श्रीनिवास मुंडे, प्रभाकर पौळ, लक्ष्मण पौळ, दिलीप राठोड, कॉ मुरलीधर नागरगोजे, कॉ भगवान बडे, रघुनाथ दादा देशमुख, रमेश पौळ, बिभीषण गित्ते यांच्या सह शेकडो शेतकरी सहभागी झाले आहेत.

**ओंकार ला ऊस देणारा शेतकरी आर्थिक संकटात :** २९५० रूपये ऊस दर जाहिर केल्याने ऊस उत्पादक शेतकरी ओंकार साखर कारखान्याकडे आकर्षित झाला. परवडणारा भाव आहे म्हणून शेकडो शेतकऱ्यांनी ओंकार साखर कारखान्यास आपला ऊस दिला. परंतु कारखान्याने शेतकऱ्यांशी दगाबाजी केली. २९५० रुपये दर दाखवून प्रत्यक्षात मात्र १८०० रूपयां प्रमाणे बीले काढली . या मुळे मोठी अपेक्षा फोल ठरली. १८०० रूपये प्रमाणे ऊसउत्पादनाचा खर्च देखील निघत नाही. वर्षभर जोपासलेले पिकाचा भाव कवडीमोल ठरल्या गेला. या मुळे ओंकार साखर कारखान्यास ऊस देणारा शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंतीप्रकरणी घाटनांदूरच्या ग्रामविकास अधिकाऱ्याविरोधात कारवाईची मागणी

**अंबाजोगाई :** घाटनांदूर (ता. अंबाजोगाई) येथील ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश फड यांच्याविरोधात सकल धनगर समाजाच्या वतीने पंचायत समिती अंबाजोगाईचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले असून, त्यांना तात्काळ कार्यमुक्त करून शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि. 31 मे 2026 रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती देशभरात आणि महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शासनाच्या नियमांनुसार महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमांना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती अपेक्षित असताना घाटनांदूर ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी महेश फड हे अनुपस्थित राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच, त्यांच्या अनुपस्थितीबाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी उध्दट व बेजबाबदार भाषेत उत्तर दिल्याचा तसेच समाजाच्या भावना दुखावतील असे वक्तव्य केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे धनगर समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून संबंधित अधिकाऱ्यांचे वर्तन शासकीय सेवकाला शोभणारे नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सकल धनगर समाजाने आपल्या निवेदनात महेश फड यांना कर्तव्यकसुरी व समाजाचा अपमान केल्याबद्दल तात्काळ सेवेतून कार्यमुक्त करण्याची मागणी केली आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी करून शासकीय नियमांनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याशिवाय शासकीय पदाचा गैरवापर करून सामाजिक तेढ निर्माण केल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दरम्यान, या निवेदनामुळे घाटनांदूर परिसरात चर्चा रंगली असून प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.


# लोकनेते गोपीनाथराव मुंडे : जनतेच्या मनातील अजरामर नेतृत्व

## पुण्यतिथीनिमित्त कृतज्ञ स्मरण

३ जून हा दिवस महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील एक वेदनादायी दिवस आहे. कारण याच दिवशी जनसामान्यांचा नेता, कार्यकर्त्यांचा आधारवड, बहुजन समाजाचा बुलंद आवाज आणि विकासाची दूरदृष्टी असलेले लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब आपल्यातून कायमचे निघून गेले. त्यांच्या निधनाला अनेक वर्षे लोटली असली तरी आजही त्यांच्या कार्याची उणीव महाराष्ट्राला आणि विशेषतः बीड जिल्ह्याला प्रकर्षाने जाणवते.

एका सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेल्या गोपीनाथराव मुंडे यांनी संघर्ष, परिश्रम आणि जनसेवेच्या बळावर महाराष्ट्राच्या राजकारणात अढळ स्थान निर्माण केले. त्यांचे संपूर्ण आयुष्य हे शेतकरी, कष्टकरी, वंचित, दुर्बल आणि सर्वसामान्य जनतेच्या हक्कांसाठी समर्पित होते. सत्ता हे त्यांच्यासाठी अंतिम ध्येय नव्हते, तर समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधन होते.

महाराष्ट्रातील युती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री म्हणून कार्य करताना त्यांनी अनेक लोकाभिमुख आणि दूरदृष्टीचे निर्णय घेतले. ग्रामीण भागातील विकासाला चालना देण्यासाठी आणि सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. कृष्णा खोरे विकास महामंडळासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांना गती देऊन





राज्यातील शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम त्यांनी केले. त्यामागे शेतकरी समृद्ध व्हावा आणि ग्रामीण महाराष्ट्र विकासाच्या मुख्य प्रवाहात यावा हीच त्यांची भूमिका होती.

शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेला झोनबंदी उठविण्याचा निर्णय हा त्यांच्या शेतकरीहितैषी विचारांचा उत्तम नमुना मानला जातो. शेतकऱ्यांना अधिक स्वातंत्र्य, चांगली बाजारपेठ आणि योग्य दर मिळावा यासाठी त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

राज्याचे गृहमंत्री म्हणून काम करताना त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा वेगळाच ठसा उमटविला. त्या काळात मुंबईत अंडरवर्ल्ड, खंडणीखोरी आणि संघटित गुन्हेगारीचे मोठे आव्हान होते. मात्र मुंडे साहेबांनी कठोर आणि धाडसी भूमिका घेत पोलिस यंत्रणेला सक्षम केले. कायदा आणि सुव्यवस्थेला प्राधान्य देत त्यांनी गुंडगिरीविरोधात प्रभावी कारवाई केली. त्यामुळे मुंबईतील संघटित गुन्हेगारीचे जाळे कमकुवत झाले आणि सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली. एक कणखर आणि निर्णयक्षम गृहमंत्री म्हणून त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला.

मात्र गोपीनाथराव मुंडे साहेबांची खरी ताकद त्यांच्या पदात नव्हती, तर कार्यकर्त्यांशी असलेल्या त्यांच्या जिव्हाळ्याच्या नात्यात होती. राज्याच्या कोणत्याही भागातील कार्यकर्ता त्यांच्यासाठी महत्त्वाचा होता. कार्यकर्त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणे, त्यांना संधी देणे, त्यांच्यावर विश्वास ठेवणे आणि नवीन नेतृत्व घडविणे ही त्यांची कार्यशैली होती. म्हणूनच आजही लाखो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याबद्दल अपार प्रेम आणि आदर आहे.



शंकर देशमुख
*जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी,

बीड जिल्ह्याचा सुपुत्र म्हणून त्यांनी जिल्ह्याचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात अभिमानाने उंचावले. त्यांच्या नेतृत्वामुळे बीड जिल्ह्यातील असंख्य युवकांना राजकीय, सामाजिक आणि सार्वजनिक क्षेत्रात संधी मिळाली. त्यांच्या अकाली निधनामुळे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर बीड जिल्ह्याचेही मोठे नुकसान झाले. आजही अनेकांच्या मनात एकच भावना आहे की, मुंडे साहेब आज असते तर बीड जिल्हा विकासाच्या आणखी उंच शिखरावर पोहोचला असता. त्यांच्या नेतृत्वाची उणीव आजही प्रत्येक विकासकामात जाणवते.

आज गोपीनाथराव मुंडे साहेब आपल्यात नसले तरी त्यांचे विचार, जनसेवेची तळमळ आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता यांचा वारसा लोकनेत्या नामदार पंकजाताई मुंडे समर्थपणे पुढे नेत आहेत. मुंडे साहेबांनी ज्या प्रेमाने, विश्वासाने आणि आपुलकीने कार्यकर्त्यांना जोडले, त्याच परंपरेचे दर्शन पंकजाताईंच्या कार्यशैलीतही घडते. राज्यभरातील कार्यकर्त्यांशी त्यांनी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले असून समाजातील वंचित, शेतकरी आणि सर्वसामान्य घटकांच्या प्रश्नांसाठी त्या सातत्याने संघर्ष करत आहेत.

मुंडे साहेबांनी पेटविलेला जनसेवेचा दीप आजही पंकजाताईंच्या नेतृत्वातून तेवत आहे. त्यामुळे मुंडे साहेबांचे विचार, त्यांचा संघर्ष आणि त्यांनी घडविलेली कार्यकर्त्यांची फळी आजही समाजहितासाठी कार्यरत आहे. हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब हे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते, तर जनतेच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक होते. संघर्षातून उभे राहून जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे हे नेतृत्व आजही लाखो कार्यकर्त्यांना प्रेरणा देत आहे आणि पुढील अनेक पिढ्यांनाही प्रेरणा देत राहील.

"लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब हे व्यक्ती नव्हते, तर एक विचार होते; आणि तो विचार आजही लाखो कार्यकर्त्यांच्या हृदयात जिवंत आहे. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वातून तो विचार नव्या जोमाने पुढे वाटचाल करत आहे."

गोपीनाथ गड साक्ष आहे तुमच्या त्यागाची,
आणि लाखो कार्यकर्त्यांच्या अथांग प्रेमाची।
जोवर चंद्र सूर्य राहतील या नभावर,
तोवर तुमचे नाव राहील इथल्या मना मनावर ।।

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन! ■

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्ह्यात अवैध व्यवसाय विरोधी मोहीम

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०२ जून : नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी व लातूर जिल्हयातील पोलिस पथकांनी जिल्हयात गुटखा, मटका, जुगार, अवैध दारु विक्री, अवैध शस्र व इतर अवैध व्यवसायांचे विरोधात दि. १ ते ३१ या कालावधीत मोहीम उघडली होती. या महिनाभरात लातूर जिल्हयात ५७० गुन्हे दाखल करत ३ कोटी ८३ लाख ६० हजार ६२१ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. सदर मोहिमे दरम्यान, गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत ६, महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत ११७, महाराष्ट्र दारुबंदी कायदयान्वये ३३०, शख अधिनियमान्वये १०, तर इतर अधिनियमाखाली १०७, अशा कारवाया करुन इसमाविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ३ कोटी ८३ लाख ६० हजार ६२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



## विविध वृत्त...

### एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ

तभा वृत्तसेवा

लातूर,दि. ०२ जून : जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एचएसआरपी) बसवण्यासाठी यापूर्वी दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, परंतु अद्यापही राज्यातील अनेक वाहनांवर एचएसआरपी प्लेट्स बसवल्या नसल्याचे आढळून आल्यामुळे प्रशासनाने आता या जुन्या वाहनांना क्रमांक पाटी बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

या अंतिम मुदतीनंतर, म्हणजेच ०१ जुलै २०२६ पासून एचएसआरपी प्लेट न बसविणाऱ्या सर्व जुन्या व नव्या वाहनांवर 'वायुवेग पथकाद्वारे' कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, मात्र ज्या वाहन मालकांनी ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी प्लेट बसवण्यासाठी पुढील अपॉइंटमेंट घेतली आहे, अशा वाहनांवर कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये असे स्पष्ट करण्यात आले आहे.

परिवहन आयुक्त यांच्या कार्यालयीन परिपत्रकानुसार, एचएसआरपी प्लेट न बसविणाऱ्या वाहन मालकांचे वाहन हस्तांतरण आणि वित्त बोजा चढविणे किंवा उतरविणे इत्यादी कामांवर आधीच निर्बंध लागू करण्यात आले आहेत. यापुढे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची पुनर्नोंदणी, वाहनात बदल करणे आणि परवाना नूतनीकरण इत्यादी सर्व महत्त्वाची कामे (योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण वगळून) थांबविण्यात यावीत, असे निर्देश परिवहन आयुक्तांनी दिले आहेत. या पार्श्र्वभूमीवर, वाहनधारकांनी मुदतीनंतर होणारी कायदेशीर कारवाई आणि प्रशासकीय अडचणी टाळण्यासाठी आपल्या वाहनांवर एचएसआरपी प्लेट बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन लातूर प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयामार्फत प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

## निरोगी पोलीस दल हीच सक्षम कायदा - सुव्यवस्थेची हमी

### जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालयात विशेष मुख आरोग्य तपासणी व तंबाखू मुक्ती जनजागृती अभियान

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ०२ जून : समाजाच्या सुरक्षेसाठी चोवीस तास कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचे आरोग्य सुदृढ राहणे ही काळाची गरज असून, निरोगी पोलीस दल हे प्रभावी आणि सक्षम कायदा-सुव्यवस्थेचे आधारस्तंभ आहे. याच उद्देशाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून जागतिक तंबाखूविरोधी दिनाच्या निमित्ताने इंडियन डेंटल असोसिएशन लातूर शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे विशेष मुख आरोग्य तपासणी व तंबाखूमुक्ती जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास पोलीस अधिकारी, अंमलदार व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुख



आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच तंबाखू, गुटखा, मावा आणि धूम्रपानाच्या व्यसनामुळे उद्भवणाऱ्या गंभीर आजारांबाबत जनजागृती करण्यात आली.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. श्रीराम बनसोडे यांनी तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणारे ओरल सबम्युकस फायब्रोसिस,ल्युकोप्लाकिया, मुखाचा कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांची माहिती दिली. मुखातील लहानसहान बदल, जखमा किंवा पांढरे-लाल चट्टे यांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर तपासणी करून उपचार घेणे किती महत्त्वाचे आहे, याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर उपक्रमादरम्यान तंबाखू अथवा इतर व्यसनांच्या आहारी गेलेल्या कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक समुपदेशन करण्यात आले. त्यांना व्यसनमुक्तीसाठी आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन, मानसिक आधार आणि आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याबाबत माहिती देण्यात आली.

यावेळी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, पोलीस अधिकारी व कर्मचारी हे समाजाच्या सुरक्षेसाठी स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता अनेकदा कठीण परिस्थितीत कर्तव्य बजावत असतात. अशा परिस्थितीत त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. तंबाखू आणि तत्सम व्यसने केवळ व्यक्तीच्या आरोग्यावर परिणाम करत नाहीत, तर त्याच्या कार्यक्षमतेवर आणि कुटुंबाच्या जीवनावरही विपरीत परिणाम करतात. त्यामुळे प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याने तंबाखूमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करून स्वतःच्या आरोग्याबरोबरच समाजासमोरही आदर्श निर्माण करावा. लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने आरोग्य संवर्धनासाठी अशा विविध उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन देण्यात येईल. त्यांनी आय. डी.ए. लातूर शाखेने राबविलेल्या या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे विशेष कौतुक करत पोलीस दलाच्या आरोग्य संवर्धनासाठी दिलेल्या योगदानाबद्दल सर्व दंतचिकित्सकांचे आभार व्यक्त केले.

या अभियानात आय.डी.ए. लातूर शाखेचे डॉ. शैलेश पडगीळवार, डॉ. साफल्य कडातने, डॉ. श्रीराम बनसोडे, डॉ. सुप्रिया सोनटक्के, डॉ. पीयुष कटके, डॉ. ज्ञानेश्र्वर कराड, डॉ. पवन कुलकर्णी, डॉ. अजित साखरे, डॉ. निलम जाधव, डॉ. ज्ञानेश व्यास, डॉ. रुपाली कांबळे आणि डॉ. शितल रेड्डी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून तपासणी व जनजागृतीचे कार्य पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी आय.डी.ए. लातूर शाखेच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. तसेच समाजामध्ये तंबाखूमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी आणि आरोग्यविषयक जनजागृती वाढविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

हा उपक्रम केवळ आरोग्य तपासणीचा कार्यक्रम न ठरता पोलीस दलामध्ये आरोग्याविषयी सजगता, व्यसनमुक्तीची प्रेरणा आणि कर्करोग प्रतिबंधाबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला. समाजाच्या सुरक्षेबरोबरच पोलीस दलाच्या आरोग्य सुरक्षेलाही तितकेच महत्त्व असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## 'संघर्षपिटक'चे विश्वजीत प्रतिष्ठानकडून प्रकाशन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : विश्र्वजीत प्रतिष्ठान लातूर यांच्या वतीने पँथर ते रिपब्लिकन चळवळीतील अग्रेसर असलेले श्रीहरी कांबळे यांच्या कथनातून श्रीहरी कांबळेलिखीत 'संघर्षपिटक' आत्मचरित्राचा प्रकाशन सोहळा विश्र्वजीत प्रतिष्ठान लातूरच्या वतीने भालचंद्र ब्लड बँक या ठिकाणी पार पडला. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुरेश वाघमारे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्राचार्य डॉ. दुष्यंत कठारे, प्रा. डॉ. जयद्रथ जाधव, ॲड. बळवंत जाधव, ॲड. वैभव सूर्यवंशी, पँथर नेते श्रीहरी कांबळे व सौ. सुरेखा श्रीहरी कांबळे हे उपस्थित होते.

प्राचार्य दुष्यंत कठारे यांनी पुस्तक व लेखकांच्या मनातील अशयावर विस्तृतपणे भाष्य केले, प्रमुख पाहुणे ॲड. बळवंत जाधव यांनी पँथरनी केलेल्या कार्याची माहिती दिली व तो काळ किती संघर्षाचा होता यावर प्रकाश टाकला आणि शुभेच्छा दिल्या. डॉ. जयद्रथ जाधव यांनीही आत्मचरित्राबद्दल अभ्यासपूर्ण विवेचन केले. चळवळींना उर्जा देण्यात चे काम झाले पाहिजे, पँथरच्या काळातील प्रश्र्न होते त्याची नव्याने मांडणी करण्याची गरज त्यांनी प्रतिपादीत केली. अध्यक्षीय समारोप प्रा.डॉ. सुरेश वाघमारे यांनी केला. त्यांनी चळवळ टिकली पाहिजे, सामाजिक कार्यकर्ते समाजाने जपले पाहिजेत. त्यांना बळ देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, असे प्रा.डॉ. वाघमारे यांनी सांगितले.

यावेळी पँथरचे नेते श्रीहरी कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पँथर काळात ज्या कार्यकर्त्यांनी लेखकासोबत काम केले त्यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रस्तावित प्रा. युवराज अंधोरीकर यांनी केले. कार्यक्रमात अनेक कार्यकर्त्यांकडून पँथर नेते श्रीहरी कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी वंचितचे इंजि. सचिन गायकवाड, संतोष वाघमारे, प्रताप कांबळे, सिध्दार्थ कवठेकर, नागरत्न कांबळे, अमोल बनसोडे, अमित कांबळे, दयानंद कांबळे, आनंद सुरवसे, प्रा. हिराचंद सितापुरे, किशोर वाघमारे, ॲड. संजय पैठणे, नारायण सूर्यवंशी यांच्यासह जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. गाडे यांनी तर आभार प्रा. विनोद टेंकाळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रसेनजित कांबळे, संजय सुरवसे, सचिन हिंगे, अमोल शिंदे, दत्तात्रय गायकवाड, ऋषिकेश कांबळे, निखील कांबळे आदींनी परिश्रम घेतले.

### श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेद रुग्णालया तर्फे पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिर

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त शिबीराचे आयोजन; रुग्णांना लाभ घेण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२ जून : माईस्र्, पुणे संचलित लातूर येथील श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालयाच्या वतीने लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक मा. आ. रमेशअप्पा कराड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे उद्घाटन एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराजदादा कराड यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी एमआयटी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार, अकॅडमीक व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, प्रशासकीय अधिकारी मधुकरराव गुटे, तसेच आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत चाटे, उपप्राचार्य डॉ. बंडगर सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शिबिराच्या अनुषंगाने मौलिक मार्गदर्शन करून जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमास प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर रुग्ण तपासणीस प्रारंभ करण्यात आला असून शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

लातूर येथील एमआयटी परिसरात श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालय हे शंभर खाटांचे सुसज्ज रुग्णालय असून येथे आयुर्वेदातील एम.डी. व एम.एस. पदवीधारक अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, मणक्यांचे आजार तसेच इतर दीर्घकालीन व दुर्धर आजारांवर आयुर्वेद पद्धतीने उपचार, योग्य जीवनशैलीविषयक सल्ला व मार्गदर्शन दिले जाते.

रुग्णालयात अत्याधुनिक सुविधांनी युक्त फिजिओथेरपी विभाग कार्यरत असून आहार व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन, रोगप्रतिबंधक आरोग्य मार्गदर्शन तसेच निरोगी जीवनशैलीबाबत विशेष समुपदेशन केले जाते. तसेच रक्त व लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे, पंचकर्म विभाग आणि विविध आयुर्वेदिक उपचार केले जात असून या शिबिराच्या निमित्ताने रुग्णांसाठी रक्त व लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे तसेच विविध पंचकर्म उपचार, आयुर्वेदिक उपचार प्रक्रिया आणि शस्त्रक्रिया यांवर पन्नास टक्के विशेष सवलत देण्यात येणार आहे. तेव्हा या शिबिराचा जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालयाच्या अधिक्षक डॉ. दीप्ती नरहरे यांनी केले.

## भाजपा उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन

तभा वृत्तसेवा

लातूर दि.२ जून : धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातील भाजपाचे उमेदवार माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांचा सोमवारी धाराशिव येथे उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला याप्रसंगी भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांची उपस्थिती होती.



भारतीय जनता पार्टीच्या वतीने विधान परिषद निवडणुकीतील धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून लातूर जिल्हा भाजपचे अध्यक्ष माजी मंत्री श्री. बसवराज पाटील मुरुमकर यांना उमेदवारी दिली असून त्यांनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपा पक्षश्रेष्ठींनी अधिकृत उमेदवारी दिल्याबद्दल श्री. बसवराज पाटील यांचे यावेळी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

याप्रसंगी औसा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंदआण्णा केंद्रे, माजी आमदार ज्येष्ठ मार्गदर्शक सुरजीतसिंह ठाकुर, प्रदेश भाजपाच्या उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपा प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, या मतदार संघाचे माजी आमदार सुरेश धस, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, प्रदेश भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, विक्रमकाका शिंदे, जि.प. सदस्य महादेव साळुंके, अनिल भिसे, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, सुरज शिंदे, राजकिरण साठे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## पीकविम्यासाठी शेतकरी संघटनेचे चाबूक आपटत ठिय्या आंदोलन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ जून : लातूर जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना केवळ चार महसूल मंडळात विमा मंजूर झाला आहे. इतर महसूल मंडळातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असताना शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही. त्यामुळे आज

सोमवारी दुपारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे यांच्या नेतृत्वात लातूर येथील कृषी अधीक्षक कार्यालयात चाबूक आपटत आंदोलन केले.



गतवर्षी अतिवृष्टीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे सोयाबीन पीक पूर्ण खरडून गेले. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. मात्र रेणापूर तालुक्यातील पानगाव आणि औसा तालुक्यातील भादा, बेलकुंड आणि जळकोट तालुक्यातील घोणसी महसूल मंडळातील शेतकऱ्यांना विमा मंजूर झाला. इतर महसूल मंडळातील पीक नुकसानीची दखलंच घेण्यात आली नाही. याला जिल्हा कृषी कार्यालय आणि आय सी आय सी आय लोम्बर्ड विमा कंपनी जबाबदार आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांचा पीकविमा तात्काळ देण्यात यावा. या मागणीसाठी शेतकरी

संघटनेच्या वतीने आज सोमवारी लातूर येथील जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयासमोर दुपारी १२ वाजता आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत कृषी अधीक्षक कार्यालयात चाबूक आपटून ठिय्या आंदोलन केले.

आयसीआयसी लोबार्ड कंपनीने लातूर जिल्ह्यातून ११८ कोटी रुपये पिकविम्याची रक्कम जमा केली. आणि तीन महसूल मंडळात १९ कोटी रुपये पीकविमा शेतकऱ्यांना वाटप केला आहे. म्हणजे १०० कोटींचा भ्रष्टाचार करण्यात आला आहे. असा आरोप गजानन बोळंगे यांनी केला.

यावेळी विमा कंपनीचे प्रभास कुमार, कृषीअधीक्षक राजेंद्र कदम इतर अधिकाऱ्यांची दातखिळी बसली. शेतकऱ्यांनी प्रश्र्नाचा भडीमार केला.. तेव्हा कृषी अधीक्षक कदम यांनी आंदोलक शेतकरी, कार्यकर्त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना जर विमा आला नाही तर शेतकरी संघटना आयसीआयसी लोबार्ड कंपनीचा ऑफिस फोडणार असा इशारा शेतकरी संघटनेने शेवटी दिला. या आंदोलनात शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष गजानन बोळंगे भारतीय किसान सेना मराठवाडा प्रमुख बालाजी सूर्यवंशी, संपर्कप्रमुख दत्ता शिंगडे, तालुका प्रमुख सचिन निकम, युवा शेतकरी तालुकाप्रमुख सचिन खसे, वेंकट बोळंगे, अंगद खलंग्रे, संगमेश्र्वर कोराटे, राजकुमार नागरगोजे, नानासाहेब जाधव, बाबू तिडके, जगन गवरे, बालाजी तिडके , इलाही शेख यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# गोदावरी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी 'डीपीआर' तयार करण्याचे पर्यावरण विभागाला आदेश

## खा. डॉ. अजित गोपछडे यांच्या दोन वर्षांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जुन -**

'दक्षिण गंगा' व महाराष्ट्राची सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि आर्थिक जीवनदायिनी असलेल्या पवित्र गोदावरी नदीला पूर्णपणे प्रदूषणमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत महत्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारच्या नमामि गंगे परियोजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात नमामि गोदावरी प्रकल्प प्रभावीपणे राबवून गोदावरी नदीच्या कायमस्वरूपी पुनरुज्जीवनासाठीचा 'सविस्तर प्रकल्प अहवाल' (उ्झठ) तात्काळ तयार करण्याचे निर्देश राज्याच्या पर्यावरण विभागाला देण्यात आले आहेत. यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी गेल्या दोन वर्षांपासून केंद्र आणि राज्य सरकारकडे पाठपुरावा केला आहे. या पाठपुराव्याला यश आले आहे.

गोदावरी नदी तीरावरील पवित्र स्थळांच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्वधर्मीय भाविकांना पर्यटकांना विधीवत स्नानासाठी गोदावरीचे पाणी पूर्णपणे शुद्ध, पवित्र आणि निर्मळ स्वरूपात उपलब्ध व्हावे, हा या परियोजनेचा मुख्य संकल्प आहे. यासोबतच, आगामी २०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे संपन्न होणाऱ्या ऐतिहासिक 'सिंहस्थ कुंभमेळ्या'च्या पार्श्वभूमीवर, तसेच संत एकनाथ महाराजांची पावन कर्मभूमी असलेल्या पैठण या गोदावरी तीरावरील मोठ्या तीर्थक्षेत्रासह नदीकाठच्या सर्वच प्रमुख आध्यात्मिक केंद्रांच्या दृष्टीने शासनाच्या या निर्णयाला आता अभूतपूर्व जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. विश्वभरातून या तीर्थक्षेत्रांवर येणाऱ्या कोट्यवधी जनसमुदायाला पवित्र गोदावरी नदीच्या मूळ आणि शुद्ध रूपाचे दर्शन व्हावे, यादृष्टीने केंद्र आणि राज्य अशा दोन्ही स्तरांवरील सकारात्मक सरकारने जलशक्ती मंत्रालय आणि राज्य शासनाच्या विविध विभागांमध्ये उत्तम समन्वय प्रस्थापित करून हा पुनरुज्जीवन आराखडा युद्धपातळीवर हाती घेतला आहे. खासदार डॉ. गोपछडे यांनी १० फेब्रुवारी २०२६



रोजी राज्याच्या मुख्य सचिवांना पाठवलेल्या अधिकृत निवेदनाची तातडीने दखल घेत जलसंपदा विभागाने हा विषय राज्याच्या पर्यावरण विभागाच्या दि. ०१ मार्च २०१४ रोजीच्या राज्य नदी संवर्धन योजना धोरणांतर्गत समाविष्ट करून पुढील तातडीच्या अंमलबजावणीसाठी सुपूर्द केला आहे.

या सर्वसमावेशक परियोजनेमध्ये गोदावरी नदीचे पावित्र्य राखण्यासाठी नदीकाठच्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी (णीलरप डेलरश्र इेवळशी) कोणत्याही प्रकारचे प्रक्रिया न केलेले मैलापाणी किंवा औद्योगिक रासायनिक सांडपाणी गोदावरीच्या पात्रात सोडू नये, यासाठी कडक आणि वेळबद्ध नियमावली लागू केली जाणार आहे. संपूर्ण नदी खोऱ्यात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (डढझ), आधुनिक देखरेख यंत्रणा आणि कायदेशीर अंमलबजावणी व्यवस्था मजबूत करण्यात येईल. यापूर्वी केंद्र सरकारने राष्ट्रीय नदी संवर्धन योजना (छठउझ) अंतर्गत नांदेडमध्ये २६ चडऊ, नाशिकमध्ये १०० चडऊ आणि त्र्यंबकेश्वरमध्ये १ चडऊ क्षमतेचे डढझ प्रकल्प उभारून राज्याला भरीव पाठबळ दिले आहे. तसेच, जलशक्ती मंत्रालयामार्फत गोदावरीसह देशातील ६ प्रमुख नदी खोऱ्यांसाठी सुरू असलेल्या कंडिशन असेसमेंट अँड मॅनेजमेंट प्लॅन (उचझ) अंतर्गत महाराष्ट्रातील गोदावरी पात्राचा सर्वांगीण विकास साधला जाईल.

या ऐतिहासिक निर्णयाची पार्श्वभूमी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गोदावरीच्या कायमस्वरूपी स्वच्छतेसाठी मांडलेला अधिकृत ठराव, तसेच फेब्रुवारी २०२५ मधील तारांकित प्रश्न क्रमांक १ आणि फेब्रुवारी २०२६ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक २६९ च्या माध्यमातून संसदेत सातत्याने केलेल्या निरंतर राष्ट्रीय प्रयत्नांशी जोडलेली आहे. यावर केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने सकारात्मक प्रतिसाद देत हे निवेदन महाराष्ट्र सरकारकडे पुढील योग्य तांत्रिक प्रस्तावासाठी आणि कार्यवाहीसाठी पाठवले होते, ज्यावर आता राज्य सरकारने अत्यंत वेगाने पावले उचलली आहेत.

या महत्त्वपूर्ण टप्प्यावर विशेष कृतज्ञता व्यक्त करताना खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ,केंद्रीय जलशक्ती मंत्री आणि राज्य सरकारचे संबंधित मंत्री यांचे आभार मानले आहेत.

## धनराज डीपीवरील ओव्हरलोडमुळे नागरिक त्रस्त; उपाययोजनांची मागणी

**किनवट ,-** किनवट शहरातील धनराज डीपी अंतर्गत येणाऱ्या परिसरात वाढत्या वीजभारामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.



या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते शेख इम्रान चाँदसाब यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, धनराज डीपीवर मोठ्या प्रमाणात ओव्हरलोड होत असून दर तासाला वीजपुरवठा खंडित होत आहे. उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेत नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच कमी-जास्त दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहरात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर वारंवार वीज खंडित होत असल्याने पाणीपुरवठाही विस्कळीत होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. धनराज डीपीवरील वाढीव भार कमी करण्यासाठी नवीन डीपी किंवा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविणे, वीजवाहिन्यांचे बळकटीकरण करणे तसेच जीर्ण झालेल्या वीजवाहिन्या बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. या समस्येवर तातडीने कार्यवाही न झाल्यास महावितरण कंपनीविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही शेख इम्रान चाँदसाब यांनी दिला आहे. निवेदनाची प्रत महावितरणचे अधीक्षक अभियंता, नांदेड यांनाही पाठविण्यात आली आहे.

## शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्काराने सुभाष किनीकर यांचा सन्मान

**भोकर** -पत्रकार क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत तसेच सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात योगदान दिल्याबद्दल सुभाष नाईक किनीकर यांना शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन कोल्हापूर येथे गोव्याच्या उप -मुख्यमंत्र्याच्या हस्ते



सन्मान चिन्ह व मानपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे. कोल्हापूर येथील शाहु स्मारक भवन दसरा चौक येथे दैनिक रोखठोक यांच्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा कार्यक्रम दि. २७ मे २०२६ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाला गोव्याचे उप-मुख्यमंत्री चंद्रकांत कवळेकर, प्रशांत सातव माजी विक्रीकर आयुक्त, डॉ.पंकज भिवटे युथ आयकॉन महाराष्ट्र राज्य, जिल्हाधिकारी संजय शिंदे,शिवराज नायकवडे सचिव,पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती, रोखठोक संपादक सुरेश माडकर यांची उपस्थिती होती.सुभाष नाईक किनीकर यांचे पत्रकार क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य व सोशल मीडिया मधील त्यांच्या 'लोकभावना न्युज' माध्यमातून निर्भिड व रोखठोक बातमीपत्र हे संपादक म्हणून करतात.म्हणुन यंदाचा २०२६ चा शिवछत्रपती राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार आणि सन्मान चिन्ह व मानपत्र देऊन गौरविण्यात आले.या वेळी कार्यकारी संपादक डॉ.सुरेश राठोड, उपसंपादक गुंडोपत सुतार,निवाशी संपादक डॉ.सुशील अग्रवाल यांची उपस्थिती होती.प्रथमच आदर्श पत्रकार पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या मित्रमंडळी कडुन अभिनंदन केले जात आहे.

## 'मुसलमानों का सियासी अजेंडा' या पुस्तकावर ५ जून रोजी परिसंवाद

**नांदेड** -वंचितचे राज्य प्रदेश उपाध्यक्ष फारुख अहमद लिखित 'मुसलमानोंका सियासी अजेंडा' या पुस्तकावरील परिसंवादांचे आयोजन शुक्रवार दि. ५ जून २०२६ रोजी शहरातील सायन्स कॉलेजच्या पुरणमल लाहोटी सभागृहात सायंकाळी ६.३० वा. करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शैक्षणिक व सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक बालाजी थोटवे हे राहणार आहेत. या पुस्तकावर कोल्हापूर येथील ज्येष्ठ साम्यवादी नेत्या स्मिता पानसरे, ज्येष्ठ पत्रकार अल्ताफ सोनी हे भाष्य करणार असून नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, मसापचे जिल्हाध्यक्ष बालाजी इबितदार, अल रिझवान एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अब्दुल वहिद, मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष उद्धव पा. सूर्यवंशी, नांदेड जिल्हा सहकारी शिक्षण पतसंस्थेचे संचालक बाबासाहेब लोणे, एम. पी. जे. नांदेडचे प्रदेश उपाध्यक्ष अल्ताफ़ हुसैन यांची उपस्थिती राहणार आहे. भारतीय पिछडा शोषित संघटन, सप्तरंगी साहित्य मंडळ, बीसेफ तथा लसाकम यांच्या संयुक्त विद्यमाने फारुख अहमद यांच्या खौफ़ और नफ़रत की दौर में 'मुसलमानोंका सियासी अजेंडा' या पुस्तकावर येत्या शुक्रवारी पाच जून रोजी सायंकाळी ६.३० वा परिसंवाद आयोजित करण्यात आलेला असून परिसंवादानंतर लगेच लेखक फारुख अहमद यांची प्रकट मुलाखत होणार आहे. सदरील मुलाखत ही साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे हे घेणार आहेत. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. फुले शाहू आंबेडकरी चळवळीत अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज ठरलेल्या 'मुसलमानोंका सियासी अजेंडा' या पुस्तकावरील परिसंवाद कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी भारतीय पिछडा शोषित संघटन, सप्तरंगी साहित्य मंडळ, बीसेफ आणि लसाकम या संघटनांचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# शेतकरी पिक विम्यासाठी सुधाकर देशमुख आक्रमक ; बैलगाड्यांसह उतरले रस्त्यावर

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २ जुन -**

तालुक्यातील धानोरा मंडळातील सुमारे १८ गावांतील शेतकऱ्यांना पीकविमा न मिळाल्याने संतप्त झालेल्या शेकडो शेतकऱ्यांनी मंगळवारी उमरी शहरातील पट्रोल पंप च्या चौवरस्त्यावर बैलगाड्यांसह रास्ता रोको आंदोलन करण्यात आले .

यावेळी उपनगराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर युवा नेते सुधाकरराव देशमुख धानोरकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनामुळे उमरी-भोकर, उमरी-मुदखेड उमरी-धर्माबाद मार्गावरील वाहतूक सुमारे दोन तास पूर्णपणे ठप्प झाली. पीकविमा मिळत नसल्याने आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी बैलगाड्यांसह रस्त्यावर ठिय्या मांडला. त्यामुळे बस,खासगी वाहने आणि प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला.

भर उन्हात महिला,लहान मुले आणि नागरिकांना रस्त्यावरच थांबावे लागले. आंदोलनाची माहिती मिळताच कृषी विभाग अधिकारी, महसूल विभाग,पीकविमा कंपनी आणि पोलिस प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे निवेदन स्वीकारले. यावेळी ३० जूनपर्यंत पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविमा जमा न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.मंगळवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेल्या आंदोलनात धानोरा बु. मंडळातील विविध गावांतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. महिलांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली.

मृग नक्षत्र जवळ आले असून पेरणीसाठी बियाणे, खते आणि इतर शेतीकामांसाठी निधीची आवश्यकता असताना पीकविमा मिळाला नसल्याने शेतकरी अडचणीत आल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.यावेळी उपनगराध्यक्ष कैलास देशमुख गोरठेकर, सुधाकर देशमुख धानोरकर दिगंबर जगताप, दिलीप पाटील सावंत आदींनी मनोगत व्यक्त करत प्रशासनावर नाराजी व्यक्त केली.दत्तराव देशमुख,गणेशराव आनेमवाड,बालाजी



पंतोजी, उद्धव मामडे,आकाश सैदमवार, विठ्ठल नारलेवाड,वर्षा चंद्रकांत जाधव, वसंत जाधव, बालाजी सूर्यवंशी,नागेश बट्टेवाड यांच्यासह धानोरा,बोळसा, बिलनाळ 'तुराटी,बोथी,मंडाळा,रामखडक, हुंडा, सावरगाव आदी गावांतील शेकडो शेतकरी महिला भगिनीं आंदोलनात सहभागी झाले होते.

आंदोलनस्थळी पोलीस निरीक्षक जयप्रकाश गुट्टे, डीएसबीचे कोलबुद्धे,पोलीस उपनिरीक्षक सचिन आरमाळ, डिएसबिचे पठाण सर महसूल विभागाचे संजय सोलंकर, तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे तसेच पीकविमा कंपनीचे अधिकारी दीपक मस्के बहुसंख्य महिला भगिनीं उपस्थित होते.धानोरा मंडळ पीकविम्यासाठी पात्र : कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी शिवाजी मिरासे यांनी सांगितले की,धानोरा बु. मंडळातील एका पीक कापणी प्रयोगाबाबत विमा कंपनीने आक्षेप नोंदविला होता. या आक्षेपाची दखल घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सुकाणू समितीची बैठक घेण्यात आली.बैठकीत संबंधित बाबींची तपासणी करून आक्षेपाचे निराकरण करण्यात आले असून सुधारित अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

सध्या विमा कंपनीकडून कोणताही आक्षेप प्रलंबित नसून धानोरा (बु.) मंडळ पीकविम्यासाठी पात्र ठरले आहे. विमा पोर्टलवर नुकसान भरपाई निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध निधीनुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम जमा करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# साखळी उपोषणानंतर डुबुकवाड यांचे आमरण उपोषण सुरू!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २ जुन -**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उभारणी करण्यासाठी रीतसर परवानगी मिळावी, यासाठी वारंवार अर्ज करूनही प्रशासनाकडून परवानगी मिळत नसल्याने संतप्त झालेले मुदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते मारोती शिवाजी डुबुकवाड यांनी १९ दिवसांच्या साखळी उपोषणानंतर दि.१ जून पासुन आमरण उपोषण सुरू केले आहे.

पुतळा उभारणीच्या परवानगीसाठी मारोती डुबुकवाड हे दि. १२ मे पासून सातत्याने साखळी उपोषणाला बसले होते. मात्र,१९ दिवस उलटूनही मुदखेड नगरपालिकेचे मुख्याधिकारी किंवा तहसीलदार यांनी अद्याप उपोषणस्थळाला भेट देऊन त्यांची साधी विचारपूसही केली नाही. प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत असल्याचा थेट आरोप आंदोलकाने निवेदनाद्वारे केला आहे. प्रशासनाच्या या उदासीन आणि आडमुठ्या धोरणामुळे अखेर दि. १ जून रोजी पासुन आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

'त्या' तीन अधिकाऱ्यांवर संपूर्ण जबाबदारी उपोषणकर्ते मारोती डुबुकवाड



यांनी दिली जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि पोलीस प्रशासनाला लेखी पत्र देऊन इशारा दिला आहे की, या उपोषणादरम्यान त्यांच्या जीवाला काही बरे-वाईट झाल्यास मुख्याधिकारी (न.प मुदखेड), विश्रांतीताई माधवराव कदम (नगराध्यक्ष मुदखेड ), अभियंता अनंत कुलकर्णी (न.प मुदखेड) त्याला खालील व्यक्ती पूर्णपणे जबाबदार राहतील असे नमुद केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी नगर परिषदेने तात्काळ पुतळा उभारणीचा ठराव घेऊन तो जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांने केली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणात स्वतः लक्ष घालून तात्काळ दखल घ्यावी, अशी विनंतीही पत्राद्वारे करण्यात आली आहे.

या आंदोलनाचे पत्र मुदखेड तहसील कार्यालय, नगरपरीषद आणि मुदखेड पोलीस स्टेशन येथे अधिकृतपणे सुपूर्द करण्यात आले असून, प्रशासकीय वर्तुळात आता यावर काय निर्णय घेतला जातो, याकडे संपूर्ण मुदखेड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**खासदार रविंद्र पा. चव्हाण यांची उपोषणा स्थळी भेट**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारणीसाठी आमरण उपोषणाला बसलेल्या स्थळी नांदेड लोकसभेचे खा. रविंद्र चव्हाण यांनी उपोषणकर्ते मारोती डूबुकवाड यांना भेट देऊन या संदर्भात स्वःत लक्ष देऊन शासनाकडे पाठपुरावा करिल असे त्यांनी सांगीतले आहे.व तसेच मुख्यधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनी वरून चर्चा केली.

## राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात

**नांदेड, दि. २ जुन -**

द्रष्ट्या प्रशासक, लोककल्याणकारी राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती जिल्हा व शहर काँग्रेस कार्यालयात मोठ्या उत्सहात साजरा करण्यात आली.

यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, सुरेंद्र घोडजकर, डॉ. रेखा चव्हाण, राजेश पावडे, अनिल मोरे, आनंद चव्हाण, सत्यपाल सावंत, कुमार कुर्तडीकर, संजय वाघमारे, ललिता कुंभार, ज्योती कदम, गणेश ढगे, दिपकसिंग हुजुरीया, मुरलीधर कल्याणकर, लक्ष्मणराव सोनटक्के, देशमुख साहेब, शिवसंभो स्वामी, धनंजय उमरीकर, संदीप कदम आदीसह इतर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिमायतनगर येथील कृषी कार्यालय बेवारस

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २ जुन -**

येथील तालुका कृषी कार्यालयाला अधिकारी व कर्मचारी हे वारंवार दांडी मारत असल्याने कार्यालयात शुकशुकाट जाणवत आहे. सध्या खरिपाची पेरणी नजीक आली असताना हे अधिकारी, कर्मचारी गैरहजर राहत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कृषी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्वैराचार थांबवण्यासाठी वरिष्ठांनी लक्ष घालावे, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

खरिपाची पेरणी अगदीच तोंडावर आली असून शेतकऱ्यांना खरीप पेरणीसाठी लागणारे बी-बियाणे व रासायनिक खते कोणते वापरावे, या बाबतीत मार्गदर्शनाची खरी गरज असते. मात्र या कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी सातत्याने कार्यालयात गैरहजर असतात. सद्यस्थितीत शेतकरी बी-बियाणे व रासायनिक खतांची खरेदी करण्यासाठी कृषी दुकानावर गर्दी करी आहेत. त्याचाच फायदा घेत कृषी दुकानदार चढ्या भावाने

बी-बियाणे व रासायनिक खतांची विक्री करीत आहेत, अशी ओरड शेतकरी करीत आहेत. असे असतानाही कर्तव्यावर असलेले अधिकारी, कर्मचारी मात्र केवळ बघ्याची भूमिका घेवून कार्यालयात जाणीवपूर्वक गैरहजर राहात आहेत.


तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांनी व कृषी अधीक्षक यांनी याकडे लक्ष देवून या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तंबी देवून कार्यालयात हजर राहण्याचे आदेश द्यावेत, कृषी दुकानांवर धाडी टाकाव्यात आणि शेतकऱ्यांची होणारी लूट थांबवावी अशी मागणी शेतकऱ्यातून होत आहे.

# गोकुंद्यातील डांबरीकरण रखडले; नागरिकांमध्ये नाराजी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जुन -**

राष्ट्रीय महामार्गावरील गोकुंदा येथील सुमारे एक किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी गिट्टीचा (जीसीबी) पहिला थर अंथरण्याचे काम पूर्ण झाले असले, तरी पुढील कामाला अद्याप गती मिळालेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

अंथरलेल्या गिट्टीवरून दुचाकी चालवताना वाहनचालक घसरून पडत असल्याच्या घटना



घडत आहेत. यापूर्वी रस्त्यावरील खड्डे, धूळ आणि साचलेल्या दूषित पाण्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. आता गिट्टीमुळे नवीन अडचणी निर्माण झाल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पावसाळा तोंडावर आला असून, डांबरीकरणाचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी होत आहे. पावसाळ्यात काम करणे अवघड ठरणार असल्याने काम पुन्हा लांबणीवर पडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

उड्डाणपुलाच्या प्रस्तावाच्या कारणावरून गोकुंदा शहरातील रस्त्याची कामे अनेक वर्षे रखडल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने कंत्राटदाराकडून पावसापूर्वी डांबरीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी होत आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेतील गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी सुरू

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २ जुन -**

किनवट तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्त्या तथा आदिवासी सेवक राधाबाई पिसाराम सलाम (रा. भिलगाव) यांनी राज्य व जिल्हास्तरावर केल्यानंतर प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत चौकशी प्रक्रिया सुरू केली आहे. सदर प्रकरणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड येथील प्रकल्प संचालक यांनी पंचायत समिती किनवटच्या गटविकास अधिकाऱ्यांना पत्र पाठवून सविस्तर चौकशी अहवाल मागविला आहे. त्यानंतर पंचायत समिती किनवटकडून तालुक्यातील सर्व ग्राम पंचायत अधिकाऱ्यांना अधिकृत पत्र जारी करण्यात आले असून, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या प्रत्येक लाभार्थ्याची प्रत्यक्ष चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दि. २२ मे २०२६ रोजी पंचायत समिती किनवट येथून जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये मंजूर घरकुल लाभार्थ्यांची स्तरनिहाय माहिती तपासून चौकशी करण्यात यावी, तसेच चौकशी दरम्यान ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांना सोबत घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित चौकशी अहवाल पंचायत समिती कार्यालयासह तक्रारदार राधाबाई सलाम यांनाही परस्पर देण्यात यावा, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. राधाबाई सलाम यांनी आपल्या तक्रारीत अनेक गंभीर आरोप केले होते. ज्या लाभार्थ्यांनी प्रत्यक्षात घर बांधलेले नाही, त्यांनाच अनुदान वितरित करण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तर ज्या पात्र लाभार्थ्यांनी नियमांनुसार घर बांधणी पूर्ण केली आहे, त्यांचे अनुदान प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच काही अभियंते, अधिकारी व कर्मचारी हे आर्थिक व्यवहार झाल्याशिवाय कामे करत नसल्याचाही आरोप त्यांनी केला होता. या संपूर्ण प्रकरणी त्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट येथे निवेदन देऊन प्रमाणित प्रत घेतली होती. तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हाधिकारी नांदेड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना ई-मेलद्वारेही सविस्तर निवेदन पाठवण्यात आले होते. दरम्यान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्तरावरून चौकशीचे आदेश जारी झाल्यानंतर आता तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये घरकुल लाभार्थ्यांची फेरतपासणी होणार असल्याने अनेकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. या चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते आणि दोषींवर काय कारवाई होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे, पंचायत समितीकडून जारी करण्यात आलेल्या पत्रात या बाबतीत विलंब होणार नाही याची नोंद घ्यावी असा स्पष्ट उल्लेख करण्यात आल्याने प्रशासनाने या प्रकरणाला गांभीर्याने घेतल्याचे दिसून येत आहे.

किनवट तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजनेतील कथित गैरव्यवहार प्रकरणाला आता प्रशासकीय स्तरावर गांभीर्याने दखल घेतली जात असल्याचे चित्र समोर आले आहे. सामाजिक कार्यकर्त्या व आदिवासी सेवक राधाबाई पिसाराम सलाम यांनी केलेल्या जिल्हास्तरीय तक्रारीनंतर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड यांनी थेट चौकशीचे आदेश दिल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात ५८ सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची मोठी कारवाई

## पोलिस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांचा दणका, गुन्हेगारांमध्ये खळबळ



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

सराईत अवैध दारुचे धंदे करणारे, अवैध जुगार-मटका चालविनारे, मालाविरुध्दचे व शरीराविरुध्दचे गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या टोळींविरुध्द पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन हिंगोली यांची कडक कार्यवाही करीत कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये तब्बल ५८ गुन्हेगारांना केले हिंगोली जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

नव्यानेच जिल्ह्याचा पदभार हाती घेतलेल्या पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी हिंगोली जिल्हयातील सराईत गुन्हेगार व अवैध धंदे चालविणाऱ्या विरुध्द तसेच टोळीने गुन्हेगारी कृत्य करणाऱ्या विरुध्द कडक कार्यवाहीची भुमिका घेवुन सराईत गुन्हे करणाऱ्यां विरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही केली जात आहे.

पो.स्टे हिंगोली ग्रामीण हद्दीतील १२, पो.स्टे हिंगोली शहर हद्दीतील ११, पो.स्टे. औंढा नागनाथ हद्दीतील ०७, पो.स्टे. सेनगाव हद्दीतील ०७, पो.स्टे. हट्टा हद्दीतील ०६, पो.स्टे कुरुंदा हद्दीतील ०६, पो. स्टे बासंबा हद्दीतील ०५, पो.स्टे. आखाडा बाळापुर हद्दीतील ०२, पो.स्टे नर्सी नामदेव हद्दीतील ०२ असे एकुण ५८ सराईत गुन्हेगारांवर हिंगोली जिल्ह्यातुन तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये अवैध दारु विक्री करणारे, अवैध जुगार व मटका चालविनारे, शरीराविरुध्द व मालाविरुध्द गुन्हे करणारे यांचा समावेश आहे. सदर इसम हे सतत गुन्हे करत असुन त्यांच्या वर्तनात कोणताही बदल होत नसल्याने व त्यांचे अशा गुन्हेगारी प्रवृत्ती व हालचालीमुळे परिसरातील नागरीकांना व मालमत्तेला धोका उत्पन्न होत असल्याने पोलीस अधीक्षक रोहन यांनी सदर प्रकरणी कडक प्रतिबंधक कारवाई बाबत आदेश दिल्यावरुन नमुद आरोपीतां विरुध्द हद्दपारीचे प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक, हिंगोली येथे कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये हद्दपारीचे प्रस्ताव सादर करण्यात आले. सदर प्रस्ताव मध्ये उपविभागीय पोलीस अधीकारी उपविभाग हिंगोली ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधीकारी उपविभाग हिंगोली शहर व उपविभागीय पोलीस अधीकारी, उपविभाग वसमत यांनी सविस्तर प्राथमिक चौकशी करुन नमुद आरोपीस हिंगोली जिल्हयातुल हद्दपार करणे बाबत मा. पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचेकडे शिफारस केल्यावरुन नमुद प्रकरणी सविस्तर तपासणी करुन पोलीस अधीक्षक हिंगोली नीलाभ रोहन यांनी त्यांना प्राप्त महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अन्वये नमुद आरोपीस विवीध कालावधी करीता हिंगोली जिल्हयातुन हद्दपार केले आहे. यामध्ये एक वर्ष ते एक महिन्यापर्यंत हिंगोली जिल्ह्यातुन तडीपार केले बाबत आदेश काढले आहेत.

पोलीस अधीक्षक नीलाभ रोहन यांनी समाजात शांतता नांदावी म्हणुन सराईत गुन्हेगारांची माहिती घेवुन त्यांचे बाबत कोंबीग व ऑलआउट ऑपरेशन मधुन नियमित तपासणी तसेच त्यांचे बाबत कडक प्रतिबंधक कारवाई करीत आहेत.

# औंढा नागनाथ-जिंतूर मार्गावर प्लायवूडने भरलेल्या ट्रकला आग



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

औंढा-जिंतूर महामार्गावर रामेश्वर शिवारात उभा असलेला मालवाहू ट्रक जळून खाक झाला. सुमारे दोन तास बर्निंग ट्रकचा थरार सुरू असल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ थांबविण्यात आली होती. औंढा नागनाथ-जिंतूर महामार्गावर मालवाहतूक ट्रकची रात्रंदिवस वर्दळ सुरु असते.कर्नाटक राज्यातून औंढा नागनाथ- जिंतूर-छत्रपती संभाजी नगर कडे प्लायवूड घेऊन जाणाऱ्या ट्रकला वायरिंग सर शॉर्ट सर्किटने अचानक आग लागल्याने ट्रक मधील प्लायवूड सह ट्रक जवळून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या भीषण घटनेत सुदैवाने चालक बचावला आहे.

कर्नाटक राज्यातून लाकडी प्लायवूड घेऊन क्रमांक १९ डीएम ३५३५ हा ट्रक औंढा नागनाथ - जिंतूर मार्गे छत्रपती संभाजी नगर कडे जात होता. औंढा नागनाथ- जिंतूर महामार्गावर रामेश्वर शिवारात नऊ वाजेच्या सुमारास या ट्रकने अचानक पेट घेतल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

त्यांनी तात्काळ औंढा नागनाथ अग्निशमन दलाला फोन करून या ठिकाणी अग्निशमन बंब बोलावला. तोपर्यंत ट्रक मधील मोठ्या प्रमाणात असलेले प्लायवूड सह ट्रक जळून खाक झाले सुदैवाने या घटनेत ट्रक चालक साबेर पठाण हे वाचले आहेत परंतु ट्रक प्लायवूड जळून लाखो रुपयाचे नुकसान झाले व आग विझविण्यासाठी मदत केली. संपूर्ण ट्रकलाच आग लागलेली असल्याने अग्निशमन दलाला देखील आग विझवताना कसरत करावी लागली.

घटनेची माहिती मिळताच औंढा नागनाथ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जी एस राहिरे, पोलीस उपनिरीक्षक अमोल इंगोले, राजकुमार कुटे,तानाजी ढाकरे,आणि औंढा नागनाथ नगर पंचायत अग्निशमन दलाचे गजानन वाशीमकर ,एस पाटील यांनी मदतकार्य केले. ही आग दोन तासानंतर विझविण्यात यश आले. रस्त्याच्या कडेलाच गाडीने पेट घेतलेला असल्याने संभाव्य धोका टाळण्यासाठी या मार्गावरील वाहतूक थांबविण्यात आली होती. आग विझल्यानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली. या घटनेप्रकरणी अद्याप औंढा नागनाथ पोलीस ठाण्यात नोंद झाली नव्हती.

# रामलीला मैदानावरील वॉकींग ट्रॅकची दुरावस्था, अज्ञातांकडून पेव्हर ब्लॉकची चोरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

शहरातील नागरिकांच्या आरोग्यासाठी आणि सकाळी फिरण्यासाठी महसूल विभाग व नगरपालिकेच्या वतीने रामलीला मैदानावर लाखो रुपये खर्चून वॉकिंग ट्रॅक तयार करण्यात आला आहे. मात्र, सध्या या वॉकिंग ट्रॅकची प्रचंड दुरावस्था झाली असून, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हा ट्रॅक आता दुर्दशेच्या गर्तेत सापडला आहे. या ठिकाणी सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून, ट्रॅकवरील गट्टू (पेव्हर ब्लॉक) जागोजागी उखडले गेले आहेत. त्यामुळे सकाळी फिरायला येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसह युवकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सध्या या वॉकिंग ट्रॅकची पाहणी केली असता, अनेक ठिकाणचे गट्टू गायब झाल्याचे प्रकर्षाने दिसून येते. हे गट्टू कोणीतरी अज्ञात व्यक्ती जाणीवपूर्वक काढून घेऊन जात असल्याचा दाट संशय नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे. लाखो रुपयांचा सार्वजनिक निधी खर्च करून उभारलेल्या या वास्तूची अशी उघड्यावर लूट होत असतानाही संबंधित विभाग ढिम्म का? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

ट्रॅकवर पसरलेली घाण, कचरा आणि उखडलेल्या गट्टूंमुळे या मार्गावरून चालणे अत्यंत जिकीरीचे झाले आहे. अनेक ज्येष्ठ नागरिकांना येथे पाय घसरून पडण्याची भीती सतावत आहे. आरोग्यासाठी धावपळ करणाऱ्या नागरिकांना येथे आल्यावर केवळ दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. महसूल प्रशासन आणि नगरपालिकेने तातडीने याकडे लक्ष देऊन वॉकिंग ट्रॅकची दुरुस्ती करावी. तसेच येथील गट्टू गायब करणाऱ्या अज्ञात प्रवृत्तींचा शोध घेऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी हिंगोलीकर नागरिकांमधून जोर धरत आहे.

# नांदुरा देवी येथे प्रसादालयाची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

तालुक्यातील नांदुरा येथे सटवाई संस्थान मंदिर परिसर पर्यटन स्थळ आहे. याठिकाणी अधिकमास निमीत्त संस्थान व भक्तांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन केले जाते परंतु मंदिर परिसरात प्रसादालय किंवा सभागृह नसल्यामुळे भाविकांना उघड्यावरच नगरभोजन करावे लागत आहे. जिल्ह्यातील अनेक भाविक दर्शनासाठी व नवस फेडण्यासाठी वर्षभर देवीला येतात तसेच नवरात्रीमध्येही मोठ्या संख्येने नगर भोजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. परंतु महाप्रसाद घेण्याकरिता भाविकांना मंदिर परिसरात उघड्यावर बसावे लागते तसेच मंदिर संस्थानची कुठलीही सुविधा नाही. नांदुरा देवी परिसरात भाविकांसाठी भव्य प्रसादालयाची मागणी ग्रामस्थ आणि भाविकांमधून होत आहे.

# दाटेगाव येथील सौर प्रकल्पाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची राष्ट्रीय विराट लोकमंचची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

पर्यावरण संरक्षण, हरित ऊर्जा निर्मिती आणि प्रदूषण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यात विविध सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येत आहेत. दाटेगाव, ता.जिल्हा हिंगोली येथे प्रस्तावित २०० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार असुन सौर ऊर्जा प्रकल्पासाठी महत्वपूर्ण बाब म्हणजे छाया व्यतिरिक्त क्षेत्र असणे आवश्यक आहे, सदर प्रकल्पासाठी मुख्य करून मोकळे मैदान असणे आवश्यक असतांना प्रशासकीय यंत्रणा, जवाबदार अधिकारी, वरिष्ठ अधिकारी यांनी व मंजुरी देतांना आणि संबंधित कंपनीकडूनही पर्यावरण संरक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाच हरताळ फासल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे.

प्राप्त माहितीनुसार, वन विभागाच्या ताब्यातील अंदाजे १२०० एकर क्षेत्रात २०० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर अनेक वर्षांपासून अस्तित्वात असलेली, अंदाजे ५० वर्षे जुनी वृक्षसंपदा कोणतीही स्पष्ट व कायदेशीर परवानगी न घेता तोडण्यात आली. यामुळे स्थानिक पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले असून वन्यजीव, जैवविविधता व भूजल व्यवस्थेवरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे जंगली प्राण्यांचे व पक्ष्यांचे प्राकृतिक निवास संपुस्थात येत असुन सदर प्राणी मानवी वस्तीकडे आणि शेतात आपले रहिवास तयार करण्याचा प्रयत्न करीत असुन सर्वसामान्य लोकांवर आणि पाळीव जनावरावर जंगली प्राण्याचे हल्ले वाढत आहेत.

तसेच, स्थानिक शेतकऱ्यांचे पारंपरिक वहिवाटीचे रस्ते व शेतमार्ग बंद करण्यात आल्याने शेतकऱ्याना शेतात जाणे येणे कठीण झाले असुन शेतीची कामे पुर्ण करण्यास मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत. जर मशागतपूर्व कामे झाली नाही तर पुढील सर्व शेती धोक्यात येण्याची आणि शेतकऱ्याद्वारे अप्रिय कृत्य होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गंभीर प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून पर्यावरण, वनसंपदा व स्थानिक नागरिकांचे हक्क संरक्षण करण्याकरीता दोषी अधिकारी, कर्मचारी तसेच संबंधीत कंपनी यांच्यावर कायदेशीर कारवाई करून हा प्रकल्प तात्काळ रद्द करण्यात यावा अशी मागणी विराट राष्ट्रीय लोकमंचच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात दाटेगाव येथील संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी समितीमार्फत तात्काळ चौकशी करण्यात यावी. संबंधित सौर प्रकल्पासाठी मिळालेल्या सर्व परवानग्या, वनविभाग मंजुरी, पर्यावरणीय मंजुरी, वृक्षतोड परवानगी व जमीन हस्तांतरण कागदपत्रे सार्वजनिक करण्यात यावीत. वृक्षतोडीबाबत पंचनामा करून किती झाडे तोडण्यात आली याचा अधिकृत अहवाल जाहीर करावा. परवानगीशिवाय वृक्षतोड झाल्याचे आढळल्यास संबंधित कंपनी, कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. संपूर्ण प्रकरणाचा अहवाल सादर होईपर्यंत पुढील सर्व कामे तात्पुरती स्थगित करण्यात यावीत. पर्यावरणीय नुकसानीचे स्वतंत्र वैज्ञानिक मूल्यांकन करण्यात यावे आदी मागण्यांचा समावेश आहे. निवेदनावर संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल, शेख नौमान नवेद, शेख बासीत महेबुब जिल्हाध्यक्ष, उपाध्यक्ष रवी जैस्वाल आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अमृतपेठ थेट बाजारपेठेचे ५ व ६ जूनला हिंगोलीत आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने अमृतपेठ थेट बाजारपेठ या विशेष उपक्रमाचे आयोजन दि. ५ व ६ जून २०२६ रोजी शेतकरी भवन, मंगळवार बाजार, हिंगोली येथे करण्यात आले आहे. हा उपक्रम सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुला राहणार आहे.

स्थानिक उत्पादक, महिला बचत गट, ग्रामीण उद्योजक आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध प्रकारची दर्जेदार उत्पादने ग्राहकांना थेट उत्पादकांकडून उपलब्ध होणार आहेत. अहिल्यानगर येथे आयोजित अमृतपेठेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर आता हिंगोलीमध्येही या विशेष बाजारपेठेचे आयोजन करण्यात आले आहे.

अमृतपेठेमध्ये खाद्यपदार्थ व गृहउद्योग उत्पादने, नाचणी लाडू, शेंगदाणा लाडू, चकली, बाकरवडी, लोणचे, मसाले, पापड, शेव, खाकरा, थालपीठ, ढोकळा प्रीमिक्स यांसारख्या उत्पादनांसह महिला व हस्तकला वस्तू, मोती ज्वेलरी, अमेरिकन डायमंड दागिने, हॅन्डमेड नथ, माहेश्वरी साड्या, कुर्तीज, जेन्ट्स ड्रेसेस, बॅग, साडी कव्हर, ब्लाऊज तसेच खणापासून तयार करण्यात आलेली विविध उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत.

याशिवाय आयुर्वेदिक साबण, फेसवॉश, स्किन व हेयर केअर उत्पादने, परफ्यूम, अगरबत्ती तसेच सोलर पॅनल, वॉटरप्रूफिंग आर्ट अँड क्राफ्ट, नेत्र तपासणी, आरोग्य तपासणी आणि देवगड हापूस, पायरी व विविध प्रकारच्या आंब्यांचे विशेष स्टॉल नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. तसेच विविध शासकीय योजनांची माहिती व ऑनलाईन नोंदणीसाठी विशेष मार्गदर्शन केंद्रही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बाजारपेठेस भेट देण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय किंवा मोबाईल क्र ७३९१०६५४७... वर संपर्क साधावा, असे आवाहन अमृतच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

# कयाधू नदीच्या पुनरूज्जीवनाला अजूनही घाणीचा विळखा, पालकमंत्र्यांच्याहस्ते झाले होते गाजावाजात उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

हिंगोलीकरांची जीवनवाहिनी असलेल्या कयाधू नदीचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि नदीपात्र प्रदूषणमुक्त करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने कयाधू नदी स्वच्छता मोहीम अत्यंत गांभार्याने हाती घेण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर नगरपालिकेने युद्धपातळीवर काम सुरू करत नदीपात्र खोल करणे, गाळ काढणे आणि परिसर स्वच्छ करण्याचे कौतुकास्पद काम केले. मात्र, एकीकडे नदी स्वच्छ केली जात असतानाच, दुसरीकडे शहरातील सर्व घाण आणि सांडपाणी थेट कयाधू नदीपात्रातच सोडले जात आहे. त्यामुळे वरतून कीर्तन आणि खालून तमाशा अशीच काहीशी अवस्था निर्माण झाली असून, या मोहिमेवर झालेला लाखो रुपयांचा खर्च वाया जाणार का? असा संतप्त सवाल सुजाण नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

कयाधू नदीचे रूप पालटण्यासाठी आणि नदीला गतवैभव मिळवून देण्यासाठी काही दिवसांपूर्वीच या स्वच्छता मोहिमेचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात करण्यात आले होते. याप्रसंगी हिंगोलीचे आमदार तानाजीराव मुटकुळे, कळमनुरीचे आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, नगराध्यक्ष रेखाताई श्रीराम बांगर, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, शिवसेना गटनेते श्रीराम बांगर यांच्यासह नगरसेवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या मोहिमेला मोठी गती मिळाली आणि कयाधू नदीचे पात्र बऱ्यापैकी स्वच्छही झाले. मात्र, मूळ समस्येकडे दुर्लक्ष झाल्याने या स्वच्छतेला आता ग्रहण लागताना दिसत आहे.

अवघ्या काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपला आहे. सध्या कयाधू नदीत शहरातील सांडपाणी आणि मैला वाहून आणणारे नाले उघड्यावर वाहत आहेत. पाऊस सुरू झाल्यानंतर शहरातील ही सर्व घाण थेट पाण्याच्या प्रवाहाने कयाधू नदीपात्रातच साचणार आहे. जर शहरातील मुख्य नाल्यांचे पाणी नदीपात्रात जाण्यापासून रोखले नाही, तर आतापर्यंत केलेल्या स्वच्छतेचा आणि खर्चाचा काय उपयोग? असा रोकडा सवाल नागरिक करत आहेत.

नदी स्वच्छ करण्यासोबतच शहरातील घाण पाणी नदीत न जाता ते इतरत्र वळवण्यात यावे किंवा त्यावर प्रक्रिया केली जावी, अशी मागणी जोर धरत आहे. आता या गंभीर समस्येकडे जिल्हा प्रशासन, नगरपालिका आणि लोकप्रतिनिधी तातडीने लक्ष देऊन ठोस पावले उचलणार की कयाधू नदी पुन्हा घाणीच्या साम्राज्यात ढकलली जाणार, याकडे संपूर्ण हिंगोलीकरांचे लक्ष लागले आहे.

# अधीक्षक अभियंता उर्ध्वपैनगंगा प्रकल्प मंडळ कार्यालयाचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जून**

जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाचे कामकाज गतिमान, लोकाभिमुख व कार्यसुसंगत करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांनी दि. २७ मे २०२६ रोजीच्या आदेशानुसार अधीक्षक अभियंता उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड हे कार्यालय हिंगोली येथे स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार अधीक्षक अभियंता उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेड हे कार्यालय दि. ०१ जून २०२६ पासून हिंगोली येथील जुनी पोदार शाळा परिसरात कार्यरत करण्यात आले आहे. याप्रसंगी अधीक्षक अभियंता मंडळांतर्गत सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

हे कार्यालय हिंगोली येथे कार्यरत झाल्यामुळे जिल्ह्यातील तसेच परिसरातील विविध सिंचन प्रकल्पांच्या कामांना अधिक गती मिळणार आहे तसेच सिंचन व्यवस्थापनाशी संबंधित प्रश्नांचे निराकरण अधिक प्रभावीपणे व तातडीने होण्यास मदत होणार आहे. शेतकरी व लाभधारकांना प्रशासनाशी समन्वय साधणे सुलभ होणार असून जलसंपदा विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीतही यामुळे सकारात्मक परिणाम अपेक्षित आहेत. उर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळाचे कार्यालय हिंगोली येथे सुरू झाल्याने सिंचन विकासाला चालना मिळून परिसरातील कृषी क्षेत्राच्या विकासासही मोठी मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.